दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३४८ I शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

‘अहिंसा हे दुर्बलांचे नाही.. तर बलवानांचे शस्त्र आहे’
गांधी जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!



# खासगी शाळांतील शिक्षकांचीही आता टीईटी तपासणी!

## यूडायस प्रणालीतून माहिती संकलन; इयत्ता १ ली ते ८ वीच्या शिक्षकांना ऑगस्ट २०२८ पर्यंत पात्रता पूर्ण करण्याची मुदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : राज्यातील सरकारी आणि अनुदानित शाळांनंतर आता खासगी विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहाय्यित शाळांमधील शिक्षकांच्या शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पात्रतेचीही तपासणी केली जाणार आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. त्यामुळे खासगी शाळांमधील शिक्षकांची टीईटी पात्रतेची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया शिक्षण विभागाकडून सुरू करण्यात येणार आहे.**

आतापर्यंत टीईटी पात्रतेसंदर्भातील कार्यवाही प्रामुख्याने सरकारी आणि अनुदानित शाळांमधील शिक्षकांपुरती मर्यादित होती. मात्र, आता राज्यातील खासगी शाळांमधील शिक्षकांचीही माहिती यूडायस (UDISE+) प्रणालीच्या माध्यमातून संकलित केली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या कार्यरत शिक्षकांना टीईटी पात्रता पूर्ण करण्यासाठी ऑगस्ट २०२८ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

राज्यात सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये सात लाखांहून अधिक शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे खासगी शाळांमधील शिक्षकांची टीईटी पात्रता, प्रमाणपत्रे आणि संबंधित माहिती उपलब्ध झाल्यानंतर पुढील कार्यवाहीचे नियोजन केले जाणार आहे.

दरम्यान, टीईटी पेपरफुटी प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे. टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी गैरप्रकाराचा वापर झाला आहे का, याचीही तपासणी करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. तसेच सीटीईटी उत्तीर्ण शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची आणि कागदपत्रांची अधिकृत पडताळणी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी या प्रकरणाची वस्तुस्थिती तातडीने समोर आणणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे.

### आरटीई प्रवेशाची मुदत वाढली




आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्र पडताळणी व प्रवेश निश्चितीची मुदतही वाढविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हा निर्णय घेण्यात आला असून, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खिशात मदत!

## ट्रिगर-वनमध्ये न आलेल्या तालुक्यांचाही दुष्काळात समावेश

### अचूक पंचनामे करून शेतकऱ्याची सही घ्या : बावनकुळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी, यासाठी शासनाचा प्रयत्न सुरू आहे. पंचनामे लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांच्या खिशात काहीतरी मदत गेली पाहिजे, अशी सरकारची भूमिका असून मंत्रिमंडळ उपसमितीनेही त्याबाबत शिफारस केली आहे, अशी माहिती महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ट्रिगर-वनमध्ये समावेश न झालेल्या, मात्र प्रत्यक्षात दुष्काळी परिस्थिती असलेल्या सुमारे १५ ते १८ तालुक्यांचाही अचूक पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळाच्या कक्षेत समावेश करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.राज्यातील विविध भागांतून अशा तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागण्या आल्या आहेत. त्यामुळे टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण करण्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी अचूक पंचनामे महत्त्वाचे असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.



वर हिरव दिसतं, पण खाली काही नाही, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे. त्यामुळे केवळ ट्रिगर-वनमध्ये तालुका आला आहे की नाही, यावर न थांबता प्रत्यक्ष परिस्थितीचा अचूक पंचनामा करणे आवश्यक आहे. पंचनामा करताना शेतकऱ्याची सही घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्यक्ष नुकसानाची वस्तुस्थिती समोर येईल आणि शेतकऱ्याला योग्य मदत मिळण्यास मदत होईल, असे बावनकुळे म्हणाले.

**तीन दिवसांत सहा जिल्ह्यांची पाहणी**

पंचनामे अचूक होत आहेत की नाहीत, याची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी पुढील तीन दिवसांत सहा जिल्ह्यांचा दौरा करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. संभाजीनगर-जालना, त्यानंतर अकोला-बुलढाणा आणि ४ ऑक्टोबरला धुळे-जळगाव येथे पाहणी **(पान ४ वर)**

### शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई

मंत्री पाहणीसाठी येणार असल्याने शेताच्या बांधावर रॅम्प तयार करून शेतकऱ्यांच्या वरून उडी मारण्याच्या प्रकाराबाबत बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारे शेतकऱ्यांची थट्टा करणे योग्य नसून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात गावपातळीवरील प्रशासकीय यंत्रणा गावातच, तालुक्याची यंत्रणा तालुक्यात आणि जिल्ह्याची यंत्रणा जिल्ह्यात उपलब्ध असली पाहिजे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. दुष्काळी परिस्थितीत बँकांनी शेतकऱ्यांच्या मागे लागून कर्जवसुली करू नये. तसे झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही बावनकुळे यांनी दिला.

### महत्त्वाचे..

**दिवेआगर समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू**

**रायगड** : जिल्ह्यातील प्रसिद्ध दिवेआगर समुद्रकिनारी गुरुवारी (१ ऑक्टोबर) भीषण दुर्घटना घडली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून सहलीसाठी आलेल्या आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. हे विद्यार्थी आळंदी येथील विनर्स अकॅडमी या खासगी शिकवणी वर्गातील असून ते अकरावी व बारावीचे विद्यार्थी होते. समुद्रातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. विनर्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची सहल दिवेआगर येथे आली होती. या सहलीत विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा समावेश होता. समुद्रकिनारी गेल्यानंतर काही विद्यार्थी पाण्यात उतरले. यावेळी अचानक खोल पाण्यात गेल्याने आणि समुद्राच्या प्रवाहामुळे आठ विद्यार्थी बुडाले.

# अशोक कारखान्यावर प्रशासकीय मंडळाची टांगती तलवार

## उच्च न्यायालयाचे निर्देश २३ नोव्हेंबरपर्यंत प्रादेशिक संचालक घेणार निर्णय

■ **३९७ कोटींच्या देण्यांचा शेतकरी संघटनेचा दावा**

■ **कारखाना प्रशासनाची भूमिका अद्याप स्पष्ट नाही**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : अशोक सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक कारभारावरून सुरू असलेल्या वादाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. कारखान्यावर प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची मागणी करणाऱ्या शेतकरी संघटनेच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने प्रादेशिक संचालक (साखर), अहिल्यानगर यांना आठ आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येत्या २३ नोव्हेंबरपर्यंत होणाऱ्या निर्णयाकडे कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक आणि कामगारांचे लक्ष लागले आहे.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी गुरुवारी श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी अॅड. विजय औताडे, जितेंद्र भोसले, युवराज जगताप, निलेश शेंडगे, बाळासाहेब उंडे, शरद पवार, अशोक टेकाळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**न्यायालयाने प्रशासकीय मंडळाचा थेट आदेश दिलेला नाही**

न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने २३ सप्टेंबर २०२६ रोजी हे निर्देश दिले. न्यायालयाने अशोक कारखान्यावर थेट प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याचा आदेश दिलेला नसून, याचिकेत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे, उपलब्ध कागदपत्रे आणि संबंधित नोंदी तपासून सक्षम प्राधिकरणाने कायद्यानुसार निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले आहे.

**एनसीडीसी कर्ज थकबाकीचा मुद्दा ऐरणीवर**

अशोक कारखान्याने राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या (एनसीडीसी) योजनेतून राज्य शासनाच्या हमीवर खेळत्या भांडवलासाठी कर्ज घेतले आहे. या कर्जाच्या परतफेडीच्या अटींचे पालन न झाल्याने थकबाकी निर्माण झाल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, ३१ मार्च २०२६ अखेर एनसीडीसी कर्जापोटी सुमारे ३ कोटी ४७ लाख रुपयांची थकबाकी होती. शासन निर्णयातील **(पान ४ वर)**

# साखर कारखान्यांसाठी नवे मॉडेल

### महिनाभरात शासनाला अहवाल; इथेनॉल दर व साखरेच्या एमएसपी वाढीचा प्रस्तावही केंद्राकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यातील साखर कारखाने पूर्वीप्रमाणे १५० ते १८० दिवस चालत नसल्याने कमी दिवसांच्या ऊस गाळपामुळे साखर उद्योग आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील साखर कारखाने आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी साखर आयुक्तालय, सहकार विभाग आणि राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून नवे मॉडेल तयार करण्यात येणार आहे. त्याचा अहवाल एक महिन्यात शासनाला सादर करण्याचा निर्णय ९ सप्टेंबरच्या मंत्री समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

कारखाने केवळ दोन-तीन महिने सुरू राहिल्याने उर्वरित काळात त्यांची क्षमता वापरली जात नाही. त्यामुळे कर्जाची परतफेड, व्याजाचा भार आणि कारखाने आर्थिकदृष्ट्या सक्षम ठेवण्याचे आव्हान वाढले आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या अडचणी वाढत असून, अनेक कारखाने भाडेतत्त्वावर देण्याचे प्रमाणही वाढले आहे.

ऊस गाळपाचे दिवस वाढवण्यासाठी ऊस उत्पादकता वाढवणे, सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे आणि ऊसविकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी कृषी विभागालाही सहभागी करून घेण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महाराष्ट्र साखर उद्योगातील जैवइंधन व जैवऊर्जानिर्मिती धोरण २०२६ साठीचा प्रस्ताव ३० दिवसांत शासनाला सादर केला जाणार आहे. गूळ उद्योगासाठी सुधारित कायद्याचा मसुदा ९० दिवसांत तयार करण्यात येणार असून, हिवाळी अधिवेशनात त्यावर निर्णय अपेक्षित आहे.बी-हेवी मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर ६०.७३ वरून ६९ रुपये, तर केन ज्यूस/साखरेपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर ६५.६१ वरून ७२ रुपये प्रतिलिटर करण्याची मागणी केंद्राकडे केली जाणार आहे. साखरेची एमएसपी वाढवण्याचाही प्रस्ताव दिला जाणार आहे.

कारखान्यांवरील कपातीचे प्रस्तावित दर : मुख्यमंत्री सहाय्यता निधी १० रुपये, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ १० रुपये, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट १ रुपया, राज्य सहकारी साखर कारखाना संघ १ रुपया आणि साखर संकुल देखभाल-दुरुस्तीसाठी ५० पैसे प्रति मे.टन ऊस गाळपावर आकारले जाणार आहेत.

# सहवैमानिकाच्या हल्ल्यानंतरही भारतीय कॅप्टनने वाचविले १७४ जीव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दुबई** : दुबईहून तेल अवीवकडे निघालेल्या फ्लायदुबईच्या एफझेड-१०७३ या विमानात हवेतच घडलेल्या थरारक घटनेत भारतीय कॅप्टन स्मित माच्छर यांनी प्रसंगावधान आणि धैर्य दाखवत १७४ प्रवासी व विमान कर्मचाऱ्यांचे प्राण वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ३० सप्टेंबर रोजी विमान सुमारे ३४ हजार फूट उंचीवर असताना सहवैमानिकाने कॅप्टन माच्छर यांच्यावर चाकूने हल्ला केला. या झटापटीदरम्यान विमानाची काही क्षणांत सुमारे १४ हजार फूट घसरण झाली. गंभीर जखमी असूनही माच्छर यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्यास मदत केली. त्यानंतर प्रवासी आणि विमानातील अन्य वैमानिकांनी हल्लेखोराला नियंत्रणात घेतले.

विमानातील परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असताना आपत्कालीन संकेत देण्यात आले. कॉकपिटमध्ये झालेल्या झटापटीमुळे विमान वेगाने खाली येऊ लागले होते. मात्र, कॅप्टन माच्छर यांनी गंभीर जखमी अवस्थेतही नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. कॉकपिटचा दरवाजा उघडल्यानंतर प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना आत प्रवेश करून हल्लेखोराला रोखणे शक्य झाले. विमानात प्रवास करणारे दोन अतिरिक्त वैमानिक पुढे आले आणि त्यांनी विमानाचे नियंत्रण स्वीकारले. त्यानंतर विमानाचे सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर सुरक्षित आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

या घटनेनंतर कॅप्टन स्मित माच्छर यांच्या धाडसाचे देश-विदेशात कौतुक होत आहे. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनीही त्यांच्या धैर्याचे कौतुक केले आहे. माच्छर यांना उपचारासाठी तबूक येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान, सहवैमानिकाने हा हल्ला का केला आणि त्यामागील नेमका उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे. सुरुवातीच्या वृत्तांमध्ये विमानाचे संभाव्य अपहरण किंवा ते पाडण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले गेले असले, तरी घटनेमागील अंतिम कारण तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. फ्लायदुबईनेही तपास पूर्ण होईपर्यंत घटनेबाबत अंदाज व्यक्त न करण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू दानिश कनेरियाने ‘एक्स’वरील पोस्टमधून कॅप्टन स्मित माच्छर यांच्या धाडसाचे कौतुक केल्याचेही वृत्त आहे.

# जामखेडच्या दुष्काळासाठी कुकडीचे पाण्याबाबत सकारात्मक निर्णय

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहा; हलगर्जीपणा खपवून घेणार नाही : राधाकृष्ण विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : टंचाईच्या परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेने संवेदनशीलतेने काम करावे. नियम आणि कायद्याच्या अडचणी सांगून शेतकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण करू नका. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून जामखेड तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागाने विविध निर्णयांची कार्यवाही सुरू केली आहे. कुकडी धरण समूहातील पाण्याचा लाभ आवर्तनाच्या माध्यमातून जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल, अशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जामखेड तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत विखे पाटील बोलत होते. त्यांनी



आरणगाव येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेती पिकांची पाहणी केली. पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना दिलासा दिला.

कर्जत-जामखेड तालुक्यातील दुष्काळी भागातील प्रश्न समजून घेण्यासाठी सभापती प्रा. राम शिंदे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक झाली. यावेळी आमदार सुनील कर्जतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगराध्यक्षा प्रांजली चिंतामणी, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, वीज वितरण कंपनीचे रमेश पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी दशरथ दिघे, प्रांताधिकारी नितीन पाटील, विनायक देशमुख, अंबादास पिसाळ यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.दुष्काळी भागाला न्याय **(पान ४ वर)**

**खासगी शाळांतील शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य करण्याच्या निर्णयाकडे व्यापक शैक्षणिक सुधारणांच्या दृष्टीने पाहण्याची गरज**

# शिक्षणाचा दर्जा की केवळ पात्रतेची कागदोपत्री पूर्तता?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

शिक्षण हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नाही, तर समाजाच्या भवितव्याची पायाभरणी करणारी प्रक्रिया आहे. एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती मोजताना त्या देशातील शिक्षणव्यवस्थेचा दर्जा हा अत्यंत महत्त्वाचा निकष ठरतो. त्यामुळे शिक्षकाची गुणवत्ता, शाळांची उपलब्धता, शिक्षणासाठी होणारी गुंतवणूक आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधी या सर्व बाबींचा विचार एकत्रितपणे करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या खासगी विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांसाठीही शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी अनिवार्य करण्याच्या दिशेने शासनाने सुरू केलेली कार्यवाही महत्त्वाची ठरते.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे शिक्षकाला विशिष्ट शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता असणे आवश्यकच आहे. टीईटीच्या माध्यमातून शिक्षकाच्या अध्यापनविषयक मूलभूत क्षमतांची चाचणी घेण्याचा प्रयत्न केला जातो. सरकारी आणि अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या टीईटी पात्रतेची तपासणी होत असताना खासगी शाळांतील शिक्षकांना त्यातून पूर्णपणे वगळणे ही भूमिका प्रश्नांकित होऊ शकते. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाचा अधिकार हा शाळेच्या व्यवस्थापनाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. त्यामुळे समान शैक्षणिक निकष असण्यामागील शासनाची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे.

मात्र, टीईटी अनिवार्य करणे म्हणजे शिक्षणव्यवस्थेतील सर्व प्रश्न सुटले, असा निष्कर्ष काढणेही योग्य ठरणार नाही. आज महाराष्ट्रात शिक्षक भरती आणि बेरोजगारी हा मोठा प्रश्न आहे. पात्र शिक्षकांची संख्या वाढत असताना नियमित शिक्षक भरतीची प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे होत नसेल, तर डीएड आणि बीएड महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याबाबत तरुणांमध्ये निर्माण होणारी अनिश्चितता स्वाभाविक आहे. अनेक वर्षे शिक्षण घेऊन पात्रता मिळविल्यानंतरही नोकरीची हमी नसणे हा स्वतंत्रपणे विचार करण्याचा विषय आहे.

याच कारणामुळे शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक भरती आणि शिक्षकांच्या सेवाशर्ती या तिन्ही बाबींचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे. परीक्षा घेऊन पात्र ठरविणे आणि त्यानंतर रोजगाराच्या संधी निर्माण करणे, यामध्ये सुसंगती नसेल तर तरुणांच्या अपेक्षा आणि शासनाचे धोरण यांच्यात दरी निर्माण होते.

खासगी शाळांबाबतही हा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. खासगी शिक्षणसंस्था वाढत असताना त्यामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा अटी, वेतन, कामाचे तास, नियुक्ती प्रक्रिया आणि नोकरीची सुरक्षितता याबाबत सातत्याने चर्चा होत असते. शासनाने शिक्षकांची पात्रता तपासण्याबरोबरच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. गुणवत्तेच्या नावाखाली केवळ शिक्षकांवर नियम लादणे आणि त्यांच्या सेवाशर्तींकडे दुर्लक्ष करणे ही संतुलित शैक्षणिक धोरणाची भूमिका ठरू शकत नाही.

टीईटीच्या अंमलबजावणीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याची पारदर्शकता. टीईटी किंवा इतर शिक्षक पात्रता परीक्षांमध्ये गैरप्रकार झाल्याच्या आरोपांची चौकशी निष्पक्षपणे झाली पाहिजे. परीक्षेच्या निकालावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर त्याचा परिणाम केवळ उमेदवारांवर होत नाही, तर संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवरील विश्वासावर होतो. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याबरोबरच प्रमाणपत्रांची पडताळणीही प्रभावीपणे झाली पाहिजे.

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेसमोर मात्र टीईटीपेक्षा मोठी आव्हाने आहेत. सरकारी शाळांमधील पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांची गळती, ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील तफावत, डिजिटल साधनांची उपलब्धता, अभ्यासक्रमाचा वाढता भार आणि पालकांवरील खासगी शिक्षणाचा आर्थिक बोजा या प्रश्नांकडेही तितक्याच गांभीर्याने पाहावे लागेल.

एकीकडे काही खासगी शाळा आधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतात, तर दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ किती पोहोचतो, याचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे. शिक्षण हा बाजारपेठेतील केवळ एक व्यवहार बनू नये आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दारे बंद होऊ नयेत, याची काळजी शासनाला घ्यावी लागेल.

जागतिक स्तरावर शिक्षणाला विकासाचे प्रमुख साधन मानले जाते. युनेस्कोसह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांकडून शिक्षणातील सार्वजनिक गुंतवणूक, समान संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर सातत्याने भर दिला जातो. या व्यापक दृष्टिकोनातून महाराष्ट्राने शिक्षणासाठी किती गुंतवणूक केली, ती कुठे आणि कशा पद्धतीने वापरली जाते, याचेही सार्वजनिक मूल्यमापन झाले पाहिजे.

सरकारी शाळांकडे पाहण्याची शासनाची दृष्टी बदलण्याची गरज आहे. सरकारी शाळा म्हणजे केवळ गरीब विद्यार्थ्यांची व्यवस्था, असा दृष्टिकोन बदलला पाहिजे. सक्षम पायाभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडा सुविधा आणि डिजिटल साधने उपलब्ध करून सरकारी शाळांना गुणवत्तेचे केंद्र बनविणे शक्य आहे. त्यासाठी शिक्षकांवर केवळ जबाबदारी टाकण्याऐवजी त्यांना आवश्यक साधने आणि प्रशिक्षण देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

टीईटी अनिवार्य करण्याचा निर्णय त्यामुळे शिक्षकांच्या गुणवत्तेच्या व्यापक धोरणाचा एक भाग म्हणून पाहिला पाहिजे. पात्रता निश्चित करणे आवश्यक आहे; पण त्यासोबत पारदर्शक शिक्षक भरती, नियमित प्रशिक्षण, सन्मानजनक सेवाशर्ती, योग्य वेतन, विद्यार्थीकेंद्री अध्यापन आणि शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल तर केवळ शिक्षकाची परीक्षा घेऊन भागणार नाही; शिक्षणव्यवस्थेचीही परीक्षा घ्यावी लागेल. शिक्षक पात्र आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण त्याला शिकविण्यासाठी योग्य वातावरण आहे का, विद्यार्थ्याला शिकण्यासाठी समान संधी आहे का आणि शासन शिक्षणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवते का, हे प्रश्न त्याहून महत्त्वाचे आहेत. टीईटीच्या निमित्ताने महाराष्ट्राने या व्यापक प्रश्नांकडे पाहिले, तर हा निर्णय केवळ नियमांची अंमलबजावणी न राहता शिक्षणव्यवस्थेच्या गुणवत्तावाढीच्या दिशेने एक पाऊल ठरू शकतो.

# यशस्वी होण्यासाठी बुद्धी आणि शक्तीची गरज : प्रकाशानंदगिरी महाराज



श्रीक्षेत्र गणेशखिंड येथे सुरू असलेल्या वरद गजानन उत्सव सोहळ्याच्या निमीत्ताने गणेशखिंड येथे सुरू असलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन महोत्सव प्रसंगी काल्याचे किर्तनरूपी सेवेप्रसंगी उपस्थीतांना प्रबोधन करताना श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती महंत, स्वामी प्रकाशानंदगीरीजी महाराज व उपस्थीत भाविक भक्तगण दिसत आहे.(छाया- भानुदास बेरड)

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भोकर** : जीवनात यशस्वी होण्यासाठी बुद्धी आणि शक्तीची गरज असते. श्रीक्षेत्र गणेशखिंड येथे बुद्धीची देवता वरद गजानन आणि शक्तीची देवता महारुद्र हनुमान यांचा संगम असल्याने या परिसराला आध्यात्मिक महत्त्व लाभले आहे. माणसाने दुसऱ्याचे कौतुक केले, तर समाजही त्याचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती महंत प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी केले.

श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील श्रीक्षेत्र गणेशखिंड येथे आयोजित वरद गजानन उत्सवानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन महोत्सवाची काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी भाविकांना मार्गदर्शन करताना प्रकाशानंदगिरीजी महाराज बोलत होते.

भारतीय संस्कृती आणि पोशाख जगासाठी आदर्श असून संत-महात्म्यांच्या विचारांमुळे देशाची आध्यात्मिक परंपरा समृद्ध झाली आहे. गणेश ही अनादि देवता असून देवतांनाही गणेशाला वंदन करावे लागते, असे त्यांनी सांगितले. वारकरी संप्रदाय भावी पिढी घडविण्याचे कार्य करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यआ. हेमंत ओगले म्हणाले, श्रीक्षेत्र गणेशखिंडच्या विकासासाठी १५ लाख रुपयांचा निधी दिला आहे. यापुढेही विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. गणपती बाप्पाने भरपूर पाऊस पाडून शेतकऱ्यांना सुखी करावे, ही प्रार्थना आहे.

यावेळी माजी आ. सुभाष झांबड, नगराध्यक्ष करण ससाणे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, ज्ञानेश्वर मुरकुटे, सुधीर नवले, संत-महंत, विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कल्याणराव लकडे व शनैश्वर पवार यांनी सूत्रसंचालन केले. विविध विद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी महाप्रसाद वाटपासाठी सहकार्य केले.

# शिर्डीत ३० ऑक्टोबर रोजी भीमसैनिकांचा उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा

## गट-तट विसरून बौद्ध समाज धडकणार शिर्डीत!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला विरोध नोंदवण्यासाठी आणि 'आरक्षण वाचवा, संविधान वाचवा' या मुख्य नारा देऊन शिर्डीत ३० ऑक्टोबर रोजी एक भव्य शांततापूर्ण व संघटित जनमोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा कोणत्याही जाती, धर्म किंवा समाजाच्या विरोधात नसून, उपवर्गीकरण अनुसूचित जातींसाठी कसे धोकादायक आहे हे समाजबांधवांना पटवून देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. या मोर्च्याच्या नियोजनासाठी कोपरगाव, राहाता, संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, नेवासा व राहुरीसह नगर जिल्ह्यातील लोकांचा सहभाग असणार असून एक विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे.

या जनमोर्च्याच्या नियोजनासाठी काल शिर्डी येथील शासकीय विश्रामगृहात एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीस उत्तर नगर जिल्ह्यातील आंबेडकरी समाजातील अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी एकमुखी निर्णय घेत हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी पूर्ण ताकद लावण्याचे आवाहन केले. तसेच, हा मोर्चा सुसज्ज आणि रेकॉर्डब्रेक गर्दी करणारा ठरावा, यासाठी सर्वानी एक दिलाने व एकजुटीने काम करण्याचा ठाम विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

मोर्च्याच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक गावातील समाजबांधवांपर्यंत गावात वॉर्ड किंवा कॉर्नर मीटिंग घेणे आणि अधिक मार्गदर्शनासाठी समितीतील सदस्यांशी संपर्क साधणे आवश्यक आहे. यादरम्यान आपसातील वाद, हेवेदावे, पक्ष आणि संघटना बाजूला सारत सर्वांनी सर्व राजकारण व भेदभावाला दूर ठेवून मैदानात उतरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोशल मीडिया व बॅनर संदर्भा नुसार, केवळ समितीने मान्यता दिलेला अधिकृत बॅनरच सोशल मीडियावर शेअर करावा, कोणीही मनमानेल पद्धतीने किंवा कोणत्याही व्यक्ती, नेत्या, पक्षाच्या किंवा संघटनेच्या नावावर बॅनर शेअर करू नये असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. मोर्च्याच्या नियोजनासाठी सर्वांनी शक्य तेवढा आर्थिक सहयोग द्यावा असे आवाहन करण्यात आले आहे . ३० ऑक्टोबरला शिर्डीत केवळ निळे वादळ दिसले पाहिजे आणि गट-तट विसरून बौद्ध समाज पूर्ण शक्तीने शिर्डीत धडकणार या निर्धाराने सर्वजण जोमाने कामाला लागले आहेत.

# कर्मवीरांच्या विचारांची मशाल नव्या पिढीने पुढे न्यावी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : दि. ३० : शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून सर्वसामान्यांच्या घरापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविणारे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त रयत संकुल, लोणी येथे जयंती सोहळा व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहाची जाणीव करून देणारे मार्गदर्शन हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर बाळासाहेब केरनाथ विखे पाटील, एकनाथराव घोगरे पाटील, उत्तमराव आहेर पाटील, जनार्दन घोगरे पाटील, सुधीरजी म्हस्के यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

प्राचार्य संदीप डहाळे यांनी प्रास्ताविकातून विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन गुरुकुल प्रमुख साहेबराव किरवे व दत्तात्रय खैरे यांनी केले. ज्येष्ठ शिक्षक जालिंदर सिनारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रमुख पाहुणे डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभातून गौरव करण्यात आला. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# अमृतवाहिनी पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेमध्ये यावर्षी ९.५% डिव्हिडंट देण्यात आला असून वार्षिक सर्वसाधारण सभा ही अत्यंत खेळीमळीत संपन्न झाली. पतसंस्था चळवळीमध्ये संगमनेर तालुक्यात आदर्श संस्कृती निर्माण झाली असून त्यामधून नागरिकांना वेळेला खूप मदत होत असल्याचे प्रतिपादन चेअरमन प्रा. नारायण खेमनर यांनी केले आहे. अमृतवाहिनी संस्थेच्या द्रोणागिरी हॉलमध्ये शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्हि. बी धुमाळ, व्हाईस चेअरमन सुधीर डेंगळे, संचालक डॉ भारत बोरकर, नितीन जोंधळे, अशोक वाळे, दादाभाऊ शेपाळ ,संजय कुटे, मनोज वाकचौरे ,विक्रम अभंग, मेघा कोकाटे, सुषमा शिरसागर ,सचिव भास्कर मुंगसे, आप्पासाहेब पोकळे, विकास गुंजाळ, प्रवीण घुगे, श्रद्धा हिरे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते. चेअरमन नारायण खेमनर म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात ,माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या संस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेने सभासदांच्या हिताला कायम प्राधान्य दिले असून यावर्षी दिवाळी निमित्त ९.५% डिव्हिडंट देण्यात येणार आहे. पतसंस्था चळवळीमुळे संगमनेर तालुक्यातील नागरिकांना मोठी आर्थिक मदत होत असून विविध बिगर शेती पतसंस्थांमधूनही कर्मचाऱ्यांना मदत होत.

# कर्मवीरांनी स्वत:चे घर बांधण्यापेक्षा शिक्षणाचे मंदिर उभारले : आ. रोहित पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या महापुरुषांनी संघर्षातून समाजाला शिक्षणाची दिशा दिली. कर्मवीरांनी स्वतःचे घर बांधण्यापेक्षा शिक्षणाचे मंदिर उभारण्याला प्राधान्य दिले. विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून नव्या संधींचा शोध घ्यावा, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग सल्लागार समितीचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयासह पाच शाखांच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९ वा जयंती सोहळा झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी होते.आमदार पवार यांनी विद्यार्थ्यांनी संगणक शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, संरक्षण क्षेत्र, व्यवस्थापन आणि रोजगाराच्या बदलत्या संधींचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. रयत शिक्षण संस्था ही सर्वसामान्यांच्या शिक्षणाची आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ असल्याचे त्यांनी सांगितले.

चंद्रकांत दळवी यांनी रयत संस्थेत शैक्षणिक विकास आराखडा, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण, माजी विद्यार्थी संघ, संकेतस्थळ व शैक्षणिक सुविधांचे अद्ययावतीकरण सुरू असल्याची माहिती दिली. आमदार विवेक कोल्हे यांनी कौशल्याधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्याची गरज व्यक्त केली. आमदार आशुतोष काळे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना माहितीची सत्यता पडताळण्याचे आवाहन केले.अॅड. संदीप वर्पे, अॅड. भगीरथ शिंदे यांनी कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास विविध मान्यवर, प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी प्रास्ताविक केले. सौ. अनिता धनक यांनी आभार मानले.

# आयुर्वेदातून निरोगी जीवनशैलीचा संदेश

## सुरेखाताई कोळपे आयुर्वेद महाविद्यालयात महिनाभर जनजागृतीपर उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** ; आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून सुरेखाताई प्रकाश कोळपे आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्राच्या वतीने महिनाभर विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. आयुर्वेदाचा दैनंदिन जीवनातील उपयोग, ऋतुचर्या, आरोग्यदायी जीवनशैली तसेच स्वयंऔषधोपचाराचे दुष्परिणाम याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.या उपक्रमांत आयुर्वेद जनजागृती फेरी, पोस्टर व प्रश्नमंजुषा स्पर्धा, मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिरे, शालेय जनजागृती कार्यक्रम, ऋतूनुसार आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच रुग्ण जनजागृती कार्यक्रमांचा समावेश होता. चांदेकसारे व चासनळी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली. सुरेगाव-कोळपेवाडी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात डॉ. कुणाल पाटील यांनी 'आयुर्वेद आ कर्करोग' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कोळपेवाडी येथे विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढून नागरिकांना आयुर्वेद व ऋतुचर्येबाबत माहिती दिली. पोस्टर व प्रश्नमंजुषा स्पर्धेलाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम व द्वितीय वर्ष बीएएमएसचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

समारोपप्रसंगी संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रकाश कोळपे म्हणाले, आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी व संतुलित जीवन जगण्याची शास्त्रशुद्ध पद्धती आहे. आजार झाल्यानंतर स्वतःहून औषधोपचार करण्याऐवजी पात्र वैद्यांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. यावेळी उपाध्यक्ष डॉ. धनंजय कोळपे, प्राचार्य डॉ. प्रदीपकुमार जोंधळे, संजय कापसे व महेश गवळी उपस्थित होते.

# दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आ. खताळ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संपूर्ण महाराष्ट्रात अल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमिततेचे संकट निर्माण झाले असून, त्याचा मोठा फटका खरीप हंगामातील पिकांना बसला आहे. या संकटाच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारमधील लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पालकमंत्री सर्व आमदार खासदार शेतकऱ्यांच्या बांधावर गेले आहे याच पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांनी सुद्धा संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना दिलासा देण्याचे काम केले आहे



संगमनेर तालुक्यातील साकूर पठार भागातील हिवरगाव पठार अंतर्गत सुतारवाडी, पायरवाडी, कवठे मलकापूर, कुंभारवाडी, जांभूळवाडी आणि पिंपळगाव देपा परिसरातील नुकसानग्रस्त शेतपिकांची आमदार अमोल खताळ यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रऊफ शेख शिवसेनेचे शिवसेना उपजिल्हा प्रमुख रणजीत धेरंगे महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार खताळ म्हणाले की, पावसाने दिलेल्या प्रदीर्घ विश्रांतीमुळे तालुक्यातील अनेक भागांत सोयाबीनसह विविध खरीप पिके जळून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने या नुकसानीची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे कोणतेही निकष अथवा भेदभाव न करता सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशा स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या मदतीपासून एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहू नये, यासाठी महसूल, कृषी तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानीची पाहणी करावी. पंचनाम्याची प्रक्रिया पारदर्शक आणि वेगाने पूर्ण करून त्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करावा, अशा सूचनाही आमदार अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# श्री ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त पुणे येथील श्री संत सेवा संघाच्या वतीने ग्रंथदिंडी शोभायात्रा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त पुणे येथील श्री संत सेवा संघाचे मार्गदर्शक पूजनीय श्री संजय गुरुजी यांच्या प्रेरणेने गुरुवार दि.१ ऑक्टोबर रोजी नेवासा शहरातून ग्रंथदिंडी शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली.श्री मोहिनीराज मंदिर ते संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिर या मार्गावर काढण्यात शोभायात्रा मिरवणुकीचे नेवासा नगरीतील नागरिकांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान नेवासा,समस्त ग्रामस्थ नेवासा व श्री संत सेवा संघ यांच्या वतीने शोभायात्रा मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.ग्रंथ दिंडी शोभायात्रेचा शुभारंभ श्री मोहिनीराज मंदिरापासून करण्यात आला.डॉ.भाऊसाहेब घुले पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील, वत्सलाबाई मोहनराव वाघ,कृष्णा डहाळे,पत्रकार अशोक डहाळे, पत्रकार सुधीर चव्हाण, पत्रकार कैलास शिंदे,नगरसेवक निरंजन डहाळे,अँड.गणेश पठाडे,वेदशास्त्रसंपन्न युवा पुरोहित व भाजप अध्यात्मिक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष निखिलगुरू जोशी,लक्ष्मीकांत जोशी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी श्री संत सेवा संघाचे सेवेकरी मंगेश पडवळ यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.ग्रंथराज ज्ञानेश्वरी जेथे जन्माला आली त्या तीर्थक्षेत्र नेवासा भूमीतून आम्ही ही जयंती गुरुवर्य परमपूज्यनीय श्री संजय गुरुजी यांच्या प्रेरणेने साजरी करत आलो आहे.हया उपक्रमाला आज बारा वर्षे पूर्ण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आरती झाल्यानंतर ग्रंथ दिंडी शोभायात्रा मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.या दिंडीध्ये संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वैकुंठवाशी हभप श्री बन्सी महाराज तांबे वारकरी शिक्षण संस्थेचे बाल वारकरी टाळ मृदुंगाचा गजर करत भजने गात सहभागी झाले होते. ज्ञानोदय इंग्लिश स्कूल,सुंदरबाई कन्या विद्यालय, त्रिमूर्ती ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी ज्ञानोदयचे शिक्षक संजय आखाडे, जनार्धन बनकर,सुंदरबाई कन्या विद्यालयाच्या शिक्षिका वंदना गिजरे,प्रियंका चिंधे,त्रिमूर्ती कॉलेजचे प्रा. बाबासाहेब तांबे,प्रा.निलेश दिघे,श्री संत सेवा संघाचे सेवेकरी सहभागी झाले होते.

ग्रंथदिंडी शोभायात्रेचा समारोप संत ज्ञानेश्वर महाराज ''पैस''खांब मंदिर प्रांगणात करण्यात आला.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री,रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात,गायनाचार्य गहिनीनाथ महाराज आढाव यांनी ग्रंथदिंडीचे स्वागत करुन ज्ञानेश्वरीचे पूजन केले.ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे महत्व त्यांनी विषद केले. भाविकांच्या उपस्थितीत आरती करून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

छाया-सुधीर चव्हाण नेवासा

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या ऑनलाइन उद्‌घाटनंतर
# त्रिमूर्तीत रोजगार महाकुंभ मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ मेळाव्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन उदघाटन करण्यात आले. कौशल्यातून रोजगार, रोजगारातून समृद्धी! या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशाने रोजगार, कौशल्यविकास आणि आत्मनिर्भरतेचा संकल्प अधिक दृढ झाला.ऑनलाइन उदघाटनानंतर त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रोजगार महाकुंभ मेळावाचा प्रत्यक्ष कार्यक्रम उत्साहात पार पडला.

ऑनलाइन उदघाटन कार्यक्रमानंतर अमर जवानांना श्री.योगेश जोशी व मोरे पी.डी.यांनी मानवंदना अर्पण केली. त्यानंतर कर्नल के.पी सिंग आणि श्री योगेश जोशी यांच्या शुभहस्ते प्रत्यक्ष रोजगार महाकुंभ मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अशोक गाढे यांनी केले, तर प्रास्ताविक श्री. देवगुडे बी. आर. (शिल्प निर्देशक) श्र्यांनी केले. यावेळी महाराष्ट्र शासनाचे माननीय मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांचे विशेष सहाय्यक श्री. योगेश जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना योगेश जोशी यांनी युवकांनी उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घेत कौशल्यविकासाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. कौशल्य, रोजगार आणि



उद्योजकतेच्या माध्यमातून युवकांना आत्मनिर्भरतेची दिशा मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयीन युवकांनी शैक्षणिक पात्रतेसोबतच रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून विद्यार्थी व युवकांना विविध कंपन्या आणि रोजगाराच्या संधी एकाच व्यासपीठावर उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या रोजगार महाकुंभ मेळाव्यास जवळपास ४०० विद्यार्थी व युवकांनी उत्स्फूर्त उपस्थिती नोंदवली. विविध नामांकित कंपन्यांनी मेळाव्यात सहभाग घेत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यामध्ये सी. पी. एफ. इंडिया, लोखंडे ग्रो, रेणुका माता मल्टीस्टेट, चैतन्य ग्रो, श्रीराम फायनान्स, सचिन ऑटोमोटिव्ह, संत नागेबाबा मल्टीस्टेट, जे.पॅन टुबलर, विजय टेक्नोप्लास्ट, एल टी एच आय टी सोल्युशन प्रा . लि .यांसह विविध कंपन्यांचा सहभाग होता. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये व क्षमतांनुसार विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिला. या कार्यक्रमास योगेश जोशी,कर्नल के. पी. सिंग, विधाटे आर. एम. (शिल्प निर्देशक), देवगुडे बी. आर. (शिल्प निर्देशक), श्रीमती मोरे पी. डी. (वरिष्ठ लिपिक), डॉ. चांगदेव आरसुळे,डॉ. अनुराधा गोरे, प्रा.निकिता बर्गे, डॉ.भागवत शुभांगी, प्रा. डमाळे कृष्णा, अशोक गाढे, प्रा. संतोष जावळे, प्रा. विकास साळवे, प्रा. गोरख गुंड, प्रा. अश्विनी औटी, प्रा. ताराचंद विधाटे, प्रा. अनिकेत आरसुळे, प्रा. योगिता गायकवाड, प्रा. प्रवीण आवारे, प्रा.पल्हारे आदी मान्यवर उपस्थित होते. रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून युवकांना रोजगार, कौशल्यविकास, उद्योजकता आणि करिअरच्या विविध संधी उपलब्ध झाल्या. विविध कंपन्या आणि विद्यार्थी यांना एकाच व्यासपीठावर आणणारा हा उपक्रम युवकांच्या भविष्याला नवी दिशा देणारा ठरला.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा ॲड सुमतीताई घाडगेपाटील, ॲड स्नेहल घाडगेपाटील, डॉ.श्रुती घाडगेपाटील,चेतन चव्हाणपाटील, गौरव आमलेपाटील यांनी या कार्यक्रमातून मुलांना मिळणाऱ्या रोजगाराबाबत समाधान व्यक्त केले. या मेळाव्यासाठी त्रिमूर्ती बीएड कॉलेज आणि फार्मसी कॉलेज यांचे सहकार्य लाभले.

## द•ख•ल



### जि प प्राथ शाळा झरेकाठी येथे माहिती अधिकार दिन उत्साहात

**झरेकाठी :** माहितीचा अधिकार हा केवळ शासकीय माहिती मिळविण्याचे साधन नसून, नागरिकांना सक्षम करणारा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देत संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. माहिती अधिकाराच्या प्रभावी वापरातून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होते, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी माहिती अधिकार कायद्याच्या वापरामुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढण्यास मदत होते. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठीही या कायद्याचा प्रभावी उपयोग होऊ शकतो, असे सांगितले. माहिती अधिकारामुळे नागरिकांना प्रशासनाकडून आवश्यक माहिती मागविण्याचा अधिकार मिळतो. विद्यार्थ्यांनी या कायद्याची माहिती करून घेत त्याचा जबाबदारीने वापर करावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. याप्रसंगी सरपंच अशोक वाणी, सोमनाथ डोळे, सुनील वसंत वाघ, आरती सुरेश पवार, किरण यशवंत दोंदे, अरविंद अशोक पवार, सोनाली सावळेराम जाधव, युवराज लालचंद वाघ, दत्तात्रेय लोहाळे व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

### प्रवरा कन्याचा नेहरू हॉकी संघ राज्यात उपविजेता



**लोणी :** नेहरू हॉकी राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये लोकनेते पद्मभूषण डॉक्टर बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कन्या विद्या मंदिर चा संघ उपांत्यपूर्व सामन्यांमध्ये अमरावती संघा सोबत विद्यालयाच्या संघाने २-१ विजय मिळवत. सेमी फायनल क्रीडा प्रबोधनी पुणे या संघासोबत २-० ने आ घाडी घेत विजय मिळवला व अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना पुणे विभाग (प्रवरा कन्या विद्या मंदिर) विरुद्ध कोल्हापूर विभाग असा झाला. कोल्हापूर संघाने आघाडी घेतली व विद्यालयाच्या संघाने पुणे विभागाचे नेतृत्व करून राज्यात उपविजेते पटकावले अशी माहीती प्राचार्या विद्याताई घोरपडे यांनी दिली. या संघामध्ये सानिका बोंबाळे, हर्षदा इथापे, जान्वी वाघमोडे,केतुजा वटाणे ,गायत्री गांगुर्डे, मयुरी आवारी ,पायल बोंबाळे ,विद्या खाटीक, किरण लवांडे ,श्रद्धा लबडे, श्रावणी शिंदे ,सानिका आगलावे, गोपी चिडे ,दिव्या पांढरे ,खुशी तुपे, विशाखा महाजन यांचा सहभाग होता.खेळाडूंना विद्या घोरपडे, कल्पना कडू आणि श्वेता पाटील तसेच फुटबॉल कोच स्नेहल सुतार,सुचित्रा तांबे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### कोपरगाव नगरपरिषदेला २० कोटींचा निधी मुख्यमंत्री फडणवीस यांनी शब्द पाळला

**कोपरगाव :** कोपरगाव शहराच्या विकासाला गती देण्यासाठी तसेच मूलभूत नागरी सुविधा सक्षम करण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेला २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीत आवश्यक उपाययोजना राबविण्यासाठीही या निधीचा उपयोग होणार आहे. शहरातील पाणीपुरवठा, आरोग्य, स्वच्छता, नागरी सुविधा आणि विविध पायाभूत कामांसाठी निधीची आवश्यकता होती. शासनस्तरावर सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्यानंतर हा निधी मंजूर झाल्याने शहरातील महत्त्वाच्या विकासकामांना चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोपरगावच्या विकासासाठी दिलेला शब्द पाळला असून, हा निधी दुष्काळाशी सामना करण्यासाठीही महत्त्वाचा आधार ठरणार आहे. निधीचा योग्य व पारदर्शक वापर करून गुणवत्तापूर्ण कामे केली जातील, असे नगराध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले. निधी मंजुरीबद्दल नगराध्यक्ष संधान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे आणि आमदार विवेकभैय्या कोल्हे यांचे आभार मानले. शासन व लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शिर्डीत वाहतुकीसाठी प्रशासनाची नवीन आचारसंहिता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शहरात रिक्षांची वाढती गर्दी आणि अस्ताव्यस्त पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी रोखून वाहतूक व्यवस्था शिस्तशीर व सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून शिर्डीतील गर्दीची ठिकाणे आता मोकळा श्वास घेण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

या नवीन आचारसंहितेनुसार शिर्डीत प्रभावी उपाययोजना राबवल्या जात आहेत. शहरात दोन ठिकाणी अधिकृत पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी शहरातील ठराविक ४-५ ठिकाणी एका वेळी फक्त एकच रिक्षा उभी राहील. ती भरून गेल्यानंतरच दुसरी रिक्षा त्या ठिकाणी येईल आणि उर्वरित सर्व वाहने पार्किंगमध्येच थांबतील. नियम मोडणाऱ्या किंवा सहकार्य न करणाऱ्या चालक-मालकांचे थांबे कायमस्वरूपी बंद केले जातील आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. पुढील १५ दिवस शहरात आरटीओचे विशेष पथक कार्यरत राहणार असून, जुनी वाहने किंवा कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या वाहनांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, साईभक्तांना मोफत किंवा पेड पार्किंगची माहिती सहज मिळावी यासाठी ठिकठिकाणी क्यु आर कोड लावण्यात येणार आहेत. १० ते १२ जणांचे एम एस एक पथक नो-पार्किंग झोनमध्ये कारवाईसाठी तैनात असेल. नगरपरिषदेने नवीन टोइंग मशिन उपलब्ध केले असून, कारवाईच्या वेळी वाहन वेळेत न हलवल्यास २०० रुपये आणि टोइंग केल्यास ३००० रुपयांपर्यंत किंवा नियमांनुसार दंड आकारला जाईल.

## समाधान कंदेचा ३२ हजार किलोमीटरचा सायकल प्रवास; संपूर्ण भारत भ्रमणाचे स्वप्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** येथील तरुण समाधान उत्तम कंदे यांनी सायकल यात्रेच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि देशातील प्राचीन धार्मिक स्थळांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा अनोखा उपक्रम सुरू केला आहे. गेल्या दोन वर्षांत त्यांनी सायकलवरून तब्बल ३२ हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला असून, नेपाळसह बारा ज्योतिर्लिंगांपैकी दहा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले आहे.



कोकण परिसरातील प्रवास पूर्ण करून नुकतेच कोपरगाव येथे परतल्यानंतरही समाधान कंदे यांचे सायकल भ्रमण थांबलेले नाही. यात्रेचे समाधान न झाल्याने त्यांनी पुन्हा सायकलवरून पुढील प्रवास सुरू केला आहे. सध्या संत एकनाथ महाराजांच्या दर्शनासाठी त्यांनी पैठणच्या दिशेने सायकलवर प्रस्थान केले आहे.

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या समाधीस्थळी दर्शन घेऊन त्यांनी पुढील सायकल यात्रेला सुरुवात केली. या यात्रेदरम्यान देशातील प्राचीन मंदिरे, धार्मिक स्थळे, निसर्गसौंदर्य यांची माहिती घेतानाच पर्यावरण संवर्धन आणि व्यसनमुक्तीचा संदेश ते जनतेपर्यंत पोहोचवत आहेत.

दरम्यान, राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने समाधान कंदे यांचा अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आश्रमाचे व्यवस्थापक विजय जाधव, जयवंत पवार, शंकर पवार, होन आदी उपस्थित होते. विजय जाधव यांनी समाधान कंदे यांना पुढील सायकल यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. उपस्थितांचे आभारही त्यांनी मानले.

> दोन वर्षांत ३२ हजार किलोमीटरचा सायकल प्रवास पूर्ण केल्यानंतर आता संपूर्ण भारत भ्रमण करण्याचे स्वप्न समाधान कंदे यांनी व्यक्त केले आहे. सायकलच्या माध्यमातून देशभ्रमण करताना पर्यावरण संवर्धन आणि व्यसनमुक्तीचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

## बास्केटबॉलमध्ये संजीवनी ज्युनिअर कॉलेजचे तालुक्यात विजेतेपद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी ज्युनिअर कॉलेज, कोपरगाव येथे १९ वर्षांखालील मुलांच्या तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

उपांत्य फेरीत संजीवनीच्या संघाने संत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज महर्षी महाविद्यालयाचा ३२-० असा पराभव केला. अंतिम सामन्यात आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कोकमठाणच्या संघावर २७-९ अशी मात करत संजीवनीने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

संघातील राजवीर सुराळकर, युवराज जगताप, सार्थक सोनवणे, वेदांत शिंपी, आदित्य दवंगे, यथार्थ चिने, राजवीर देवतरसे, रोहित क्षीरसागर, शिवेंद्र देशमुख, ओंकार चांदगुडे, राजदीप फटांगरे व ओम देवडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्रशिक्षक सत्यम कोथळकर, अक्षय येवले व श्रेयश काजळे यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयानंतर संघाची १० ऑक्टोबर रोजी आठरे पाटील पब्लिक स्कूल, सावेडी, अहिल्यानगर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, व्यवस्थापकीय विश्वस्त अमित कोल्हे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. प्राचार्या रेखा साळुंके व क्रीडा विभागाचे नानासाहेब लोंढे उपस्थित होते.

## ‘श्री गणेशा आरोग्याचा’ अभियानातून आरोग्यसेवेचा जागर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निर्देशानुसार ‘श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६’ राबविण्यात आले. या अभियानांतर्गत साईनाथ उद्योग इंडस्ट्रीजमधील कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच श्रमिकनगर येथील मल्लेशम येमुल आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिर घेण्यात आले.

अभियानादरम्यान कामगार व नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि आरोग्य शिक्षण देण्यात आले. संतुलित आहार, नियमित व्यायाम, निरोगी जीवनशैली, आजारांपासून बचावासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच आरोग्याच्या समस्या जाणवल्यास वेळेत वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार नागरिकांना वैद्यकीय मार्गदर्शनही देण्यात आले.

‘निरोगी समाज, सुदृढ कुटुंब’ ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून आरोग्यविषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांनी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे आयोजन झाले. ब्रिगेडियर डॉ. अरुण त्यागी, डॉ. प्रसाद काजळे, डॉ. सतीश मोरे यांच्यासह वैद्यकीय व सामाजिक सेवा पथकाने सहभाग घेतला. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर, उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी अभियान यशस्वी केले.

### अंगारकी चतुर्थीला वरदविनायक सेवाधाम फुलले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** अंगारकी चतुर्थीच्या मंगल पर्वावर लोणी येथील श्री वरदविनायक सेवाधाम येथे भक्तीचा अक्षरशः महासागर लोटला. मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी झालेल्या अंगारकी चतुर्थी उत्सवाला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने हजेरी लावत श्री वरदविनायकाचे दर्शन घेतले. दिवसभरात १० हजारांहून अधिक भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर गणरायाच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

अंगारकी चतुर्थीनिमित्त पहाटेपासूनच सेवाधाममध्ये धार्मिक विधींना प्रारंभ झाला. श्रींची नित्यनियम पूजा, अभिषेक व आरती झाल्यानंतर लोणी खुर्द, लोणी बुद्रुक, निर्मळक्षेत्री तसेच पंचक्रोशीतील विविध भजनी मंडळांनी भजनसेवा सादर केली. भक्तिगीत, अभंग आणि गणरायाच्या जयघोषाने मंदिर परिसरातील वातावरण अधिकच मंगलमय झाले. सायंकाळच्या नित्यनियम आरतीनंतर ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक-नेवासेकर यांच्या हरिकीर्तनाचा कार्यक्रम झाला. अध्यात्म, भक्ती आणि संस्कारांचा संदेश देणाऱ्या त्यांच्या कीर्तनाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रांग लागली होती. दूरवरून आलेल्या भाविकांसाठी सेवाधाम परिवाराच्या वतीने महाप्रसादाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासोबतच हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गर्दीचे नियोजन, भाविकांची सेवा आणि कार्यक्रमाची शिस्तबद्ध अंमलबजावणी यामुळे उत्सव सुरळीत पार पडला.

अंगारकी चतुर्थीचा हा सोहळा भक्ती, सेवा आणि अध्यात्माचा सुंदर संगम ठरला. श्री वरदविनायक सेवाधाम परिवार, भजनी मंडळे, स्वयंसेवक आणि भाविकांच्या सामूहिक सहकार्याने उत्सवाला भव्य स्वरूप प्राप्त झाले.

## म फु कृ विद्यापीठात पंडीत दिनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यभरात एकाच दिवशी ५०० केंद्रांवर आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभाअंतर्गत कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली व अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे रोजगार मेळावा उत्साहात संपन्न झाला. राहुरी कृषि विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात



पदव्युत्तर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यव्यापी रोजगार महाकुंभाचे ऑनलाइन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषेदेच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन विभागाचे माजी उपमहासंचालक डॉ. ए.के. सिंग प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजयकुमार पाटील व पदव्युत्तर महाविद्यालयाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. सुभाष घोडके उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी वर्षभर रोजगार मेळावे आयोजित केले जातील. विविध कृषि महाविद्यालयातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. याप्रसंगी डॉ. ए.के. सिंग यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना रोजगार मेळाव्याचे महत्व आणि उपलब्ध संधींबाबत मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे यांनी विद्यार्थ्यांना कृषि मधील रोजगाराच्या संधी यावर मार्गदर्शन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या रोजगार मेळाव्यासाठी विद्यापीठ परिसरातील तसेच अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील संलग्नित २२ कृषी महाविद्यालयांमधून एकूण ७९२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी ५६७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मुलाखतींमध्ये सहभाग घेतला. रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रातील ३३ नामांकित आस्थापनांनी सहभाग नोंदविला. यामध्ये बँकिंग व फायनान्स क्षेत्रातील २२, अन्नप्रक्रिया उद्योगातील ३ आणि कृषी क्षेत्राशी संबंधित ८ कंपन्यांचा समावेश होता. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून २०० पेक्षा

अधिक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, कृषी, अन्नप्रक्रिया, बँकिंग, फायनान्स आणि संबंधित विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या संधी मिळाल्या आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सात्ताबा खरबडे यांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विविध नामांकित कंपन्यांचा सहभाग यामुळे रोजगार मेळाव्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते.

## पान १ वरुन

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खिशात मदत !

केली जाणार आहे. पंचनाम्यासाठी नेमकी यंत्रणा प्रत्यक्ष शेतात आहे का आणि वस्तुस्थितीनुसार पंचनामा होत आहे का, याची तपासणी करण्यात येईल. महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागांच्या समन्वयातून पंचनामे होत असून तिन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या त्यावर असतात, असे त्यांनी स्पष्ट केले. अवैध सावकारी मोडून काढणार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अवैध सावकारांवर कठोर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना आत्महत्येकडे ढकलणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घेण्यात येणार असून, सावकार किंवा बँकांकडून फसवणूक होत असल्यास सरकारच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीला पूर्ण अधिकार देण्यात आले असून २५ ऑटोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्यासाठी निधी; सिमेंट रस्त्यांना तूर्त प्राधान्य नाही दुष्काळाच्या काळात जिल्हा नियोजन समितीचा निधी पाणी आणि चारा व्यवस्थेसाठी वापरण्यावर भर देण्यात येणार आहे. यावर्षी अनावश्यक सिमेंट रस्त्यांची कामे न घेता चाराछावण्या, जलसंधारण, रिचार्ज शाफ्ट, बंधारे आणि नाले खोलीकरण यांसारख्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना आहेत. रस्ते पुढच्या वर्षी करता येतील; सध्या जास्तीत जास्त पैसा पाण्याकडे वळवला पाहिजे, अशी भूमिका बावनकुळे यांनी मांडली. महाराष्ट्र वैरण विकास धोरणासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील पाच टक्के निधी देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असल्याचेही त्यांनी सांगितले. 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' अंतर्गत महिला बचत गटांना महसूल जमीन देऊन त्यावर चारा लागवड करण्याची योजना असल्याची माहिती त्यांनी दिली.

दुष्काळाच्या काळात टँकर, पाणीटंचाई आणि छावण्यांची व्यवस्था सरकार करणार असून, जिल्हाधिकाऱ्यांनी औद्योगिक क्षेत्रांशी संपर्क साधून सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीतून मदत मिळवावी. उद्योजक, व्यावसायिक आणि समाजातील सर्व घटकांनी दुष्काळ निवारणासाठी पुढे यावे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

### जामखेडच्या दुष्काळासाठी कुकडीचे पाण्याबाबत सकारात्मक निर्णय

देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलदगतीने निर्णय घेतले आहेत. पाण्याचे नियोजन करताना जनावरांसाठी चारा आणि पाण्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तालुयात चारा उत्पादन वाढविण्यासाठी पशुसंवर्धन आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे नियोजन करावे, अशा सूचना विखे पाटील यांनी दिल्या. पंचनाम्यांपासून कोणीही वंचित राहू नये दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याने सर्व नुकसानग्रस्तांचे पंचनामे अचूकपणे करण्यात यावेत. मदतीपासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी. टँकरच्या नियोजनासाठी ग्रामसेवक आणि तलाठी यांनी उपस्थित राहणे सक्तीचे करावे. प्रत्येक विभागातील अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे. बैठकीत चुकीची किंवा खोटी माहिती देऊ नये. अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होऊ देऊ नका; अन्यथा कारवाई करण्यास भाग पाडू नका, असा इशारा विखे पाटील यांनी दिला.अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कवडगाव, चौंडी, जवळा परिसरातील कोल्हापूर बंधाऱ्यांची कामे, मोहरी तलावाचा सांडवा तसेच कुकडी कालव्यांच्या नुकसानग्रस्त भागाच्या दुरुस्तीसाठी जलसंपदा विभागाने निधी उपलब्ध करून दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.सभापती प्रा. राम शिंदे यांनी तालुयातील विविध प्रश्नांचा आढावा घेत कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी जामखेड तालुयाला मिळावे, अशी मागणी केली. दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासनाने आवश्यक निर्णय घेतले असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. कोणाला खूश करण्यासाठी चुकीची माहिती देऊ नये. पीकविमा, वीज आणि जलजीवन मिशनच्या योजनांबाबत प्रशासनाने अधिक गांभीर्याने काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी आमदार सुनील कर्जतकर यांनीही विविध सूचना मांडल्या.

### अशोक कारखान्यावर प्रशासकीय मंडळाची टांगती तलवार

तरतुदींनुसार कर्ज थकीत राहिल्यास संबंधित संचालक मंडळावर कारवाई करून प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची तरतूद असल्याचा दावा संघटनेने केला आहे. तक्रारीनंतर उच्च न्यायालयात धाव शेतकरी संघटनेने २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर यांच्याकडे कारखान्याच्या कारभाराबाबत तक्रार केली होती. या तक्रारीनंतर द्वितीय लेखापरीक्षकाची नियुक्ती करून अहवाल मागविण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. मात्र, पुढील कारवाईला विलंब होत असल्याचा आरोप करत संघटनेने ३ सप्टेंबर रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवरील सुनावणीनंतर न्यायालयाने संबंधित विभागाला आठ आठवड्यांच्या कालावधीत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. ३९७ कोटींच्या देण्यांचा दावा शेतकरी संघटनेच्या दाव्यानुसार, अशोक कारखान्यावर अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सुमारे २८० कोटी, एनसीडीसीचे १०४ कोटी आणि कामगारांची सुमारे १३ कोटी रुपये अशी एकूण सुमारे ३९७ कोटी रुपयांची देणी आहेत.कामगारांचे वेतन दोन वर्षांपासून थकीत असल्याचा दावा करत संघटनेने कामगारांमध्ये नाराजी असल्याचे म्हटले आहे.३ नोव्हेंबरकडे श्रीरामपूरचे लक्ष अशोक कारखाना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रशासकीय मंडळ नियुक्त करावे, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. दरम्यान, या आरोपांबाबत कारखाना प्रशासनाची स्वतंत्र भूमिका अद्याप समोर आलेली नाही. उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता प्रादेशिक संचालक (साखर), अहिल्यानगर यांच्याकडून होणाऱ्या निर्णयाकडे श्रीरामपूर तालुयातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबर हा दिवस अशोक कारखान्याच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरण्याची शयता आहे.

# दुष्काळाची दाहकता; पिके सुकली, शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत, हजारो हेक्टर क्षेत्र बाधित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर : दिपक बरकसे**

यंदाच्या खरीप हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने वैजापूर तालुक्यात दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाअभावी शेतातील पिके करपून गेली असून अनेक ठिकाणी विहिरी, बोअरवेल आणि पाण्याचे पारंपरिक स्रोत आटण्याच्या स्थितीत आहेत. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम पाण्याअभावी वया गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

वैजापूर तालुक्यात सुमारे १ लाख ३५ हजार हेक्टर क्षेत्रात शेती केली जाते. यापैकी बहुतांश भागावर यंदाच्या पावसाच्या अनियमिततेचा आणि खंडित पावसाचा परिणाम झाला आहे. सुरुवातीला पावसाने काहीसा दिलासा दिल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने उगवलेली पिके वाढीच्या अवस्थेतच करपून गेली.

**पेरणीचा खर्चही निघेना**

मका, भुईमूग, तूर, कपाशी, सोयाबीन यांसारख्या प्रमुख खरीप पिकांना पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत, पेरणी, मजुरी आणि इतर खर्चासाठी शेतकऱ्यांनी मोठी गुंतवणूक केली. मात्र अपेक्षित उत्पादन तर दूरच; अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून पेरणीचा खर्चही निघण्याची शक्यता मावळली आहे. उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेली खरीप पिकेच हातातून गेल्याने शेतकऱ्यांसमोर पुढील हंगामासाठी भांडवल उभे करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. आधीच्या कर्जाचा भार असतानाच यंदाच्या हंगामातील खर्चासाठी घेतलेले कर्ज फेडायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

**कर्जमाफी झाली तरी शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी कायम**

कर्जमाफीच्या माध्यमातून काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी केवळ कर्जमाफीने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वपदावर आलेली नाही. यंदाचा खरीप हंगामच उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेण्याची वेळ आली आहे. कर्जमाफी झाली, पण उत्पन्नच राहिले नाही तर पुढचा हंगाम कसा करायचा? असा सवाल अनेक शेतकरी उपस्थित करत आहेत. शेतीसाठी केलेला खर्च, घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्याच्या गरजा आणि जुन्या कर्जाची परतफेड या सर्वांचा ताण शेतकऱ्यांवर वाढत आहे.

**विहिरी आटल्या; रब्बी हंगामाचीही चिंता**

पावसाअभावी केवळ खरीप पिकांवरच परिणाम झाला नसून ग्रामीण भागातील पाणीस्थितीवरही त्याचा गंभीर परिणाम दिसून येत आहे. अनेक गावांमध्ये विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. काही विहिरींनी तळ गाठला असून बोअरवेलमधूनही पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी आहेत. खरीप पिके वाचविण्यासाठी उपलब्ध पाण्याचा वापर करण्यात आला; मात्र आता पाण्याचे स्रोतच कमी झाल्याने आगामी रब्बी हंगामाबाबतही शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



**पंचनामे आणि प्रत्यक्ष मदतीची मागणी**

दुष्काळी परिस्थितीचा फटका बसलेल्या गावांमध्ये शासनाने प्रत्यक्ष पाहणी करून पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. केवळ कागदोपत्री घोषणा न करता प्रत्यक्ष शेतात झालेल्या नुकसानीचा विचार करून मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई, कर्ज पुनर्गठन किंवा आवश्यक आर्थिक मदत, पाणीटंचाईवर उपाययोजना आणि आगामी हंगामासाठी आवश्यक ते सहकार्य मिळणे गरजेचे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**हजारो हेक्टर शेती संकटात**

वैजापूर तालुक्यातील मोठ्या क्षेत्रावर पावसाच्या खंडाचा परिणाम झाल्याने हजारो हेक्टरवरील पिके संकटात आली आहेत. काही भागात पिकांची वाढ खुंटली आहे, तर अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे सुकून गेली आहेत. विशेषतः हलक्या आणि मध्यम जमिनीवरील पिकांना पाण्याच्या तुटवड्याचा मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने खरीप हंगामाची सुरुवात केली होती. मात्र पावसाच्या लहरीपणामुळे त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले आहे. त्यामुळे वैजापूर तालुक्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने तातडीने प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना ठोस मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. पिके गेली, खर्च बुडाला आणि उत्पन्नाचा आधारही हिरावला; त्यामुळे वैजापूरच्या शेतकऱ्यांसमोर आता केवळ दुष्काळाचा नव्हे, तर आर्थिक अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला

## श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळयाची सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील तेलकुडगाव येथे आयोजित श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळयाची सांगता आळंदी येथील प्रसिद्ध कीर्तनकार वाणीभूषण हभप ज्ञानेश्वर माऊली कदम(छोटे माऊली)यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून करण्यात आली.३३ कोटी देवांचे दर्शन अनुभवायचे असेल तर जीवनात आई व गाईची सेवा करा असे आवाहन ज्ञानेश्वर महाराज कदम माऊली यांनी यावेळी बोलतांना केले. या सोहळ्याच्या निमित्ताने २० सप्टेंबर २०२६ ते शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दररोज दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत श्रीमद भागवत कथेचे निरूपण जालना जिल्हयातील ह.भ.प. भागवताचार्य एकनाथजी महाराज जोशी यांनी केले या कथा सोहळयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला काल्याच्या कीर्तनात बोलतांना ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज म्हणाले, दारात गायी असावी,गाईची व आईची सेवा ही तिर्थस्थळ करण्यासारखे आहे त्यांच्या सेवेतच आपल्याला तेहतीस कोटी देवाचे दर्शन होईल. असा संदेश त्यांनी यावेळी बोलतांना दिला.किर्तनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले तेलकुडगाव ग्रामस्थ व भाविकांच्या सहभागातून हा सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मच्छिंद्र म्हस्के, चंद्रकांत म्हस्के, बबन म्हस्के, रायभान म्हस्के, संभाजी म्हस्के, राजेंद्र म्हस्के, गहिनिनाथ म्हस्के, भाऊसाहेब म्हस्के,आण्णासाहेब म्हस्के, आण्णासाहेब म्हस्के, रावसाहेब म्हस्के, नामदेव म्हस्के, तुळशिराम काळे, प्रल्हाद काळे, शिवाजी काळे, कृष्णा म्हस्के, विठ्ठल पा. गायकवाड, एकनाथ म्हस्के तसेच समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ तेलकुडगाव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश स्कूलला दुहेरी विजेतेपद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** आज श्रीरामपूर क्रीडा समिती आयोजित तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा कचेरी ग्राउंड मिनी स्टेडियम मैदानावर पार पडल्या. तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश स्कूलने १७ वर्षाखालील मुली १९ वर्षाखालील मुली अशा दोन्ही वयोगटात विजय संपादन करून दुहेरी विजेतेपद मिळवले. १७ वर्षे वयोगट मुली अंतिम सामना न्यू इंग्लिश स्कूल विरुद्ध श्री चैतन्य स्कूल यांच्यामध्ये झाला या सामन्यामध्ये उत्कृष्ट अशी खेळी करून न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या संघाने विजय मिळवला. तसेच १९ वर्षाखालील मुलींच्या अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कूल विरुद्ध महाले पोद्दार स्कूल यांच्यामध्ये अतिशय रंगतदार असा अंतिम सामना झाला या सामन्यांमध्ये न्यू इंग्लिश स्कूलने चमकदार कामगिरी करत विजय संपादन केलं. विजेता संघास क्रीडा मार्गदर्शक नितीन



गायधने सर यांचे मार्गदर्शन लाभले. ालुका बास्केटबॉल विजेतपद मिळाल्याबद्दल एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष राम शेठ टेकावडे, सचिव जन्मजय टेकावडे, बाळासाहेब ओझा, प्रा. दत्तात्रय घोगरे, श्रीरामपूर क्रीडा समिती अध्यक्ष संभाजी ढेरे, उपाध्यक्ष दत्ता घोरपडे, नितीन बलराज, आसिफ पठाण, धर्मराज कुऱ्हाडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कणगर सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील कणगर सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी संस्थेचे चेअरमन अन्सार शेख यांच्या अध्यक्षतेखाली आणि बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या प्रारंभी संस्थेचे सचिव मच्छिंद्र साबळे यांनी संस्थेच्या कामकाजाचा अहवाल सभासदांसमोर सादर केला. संचालक अण्णासाहेब शेटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संस्थेच्या माध्यमातून नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या तसेच जास्तीत जास्त कर्ज भरणाऱ्या सभासदांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच डाळिंब उत्पादनामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचाही गौरव करण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम सुरू असल्याचे यावेळी चेअरमन अन्सार शेख यांनी सांगितले. तर सभापती अरुण तनपुरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.

सभेस संस्थेचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब घाडगे, सरपंच सर्जे राव घाडगे, उपसरपंच बाळासाहेब गाडे, जिल्हा बँकेचे राजेंद्र शेरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य भास्कर गाडे, सुयोग नालकर, नवनाथ मुसमाडे, गोरक्ष नालकर, मच्छिंद्र वरघुडे, संदीप घाडगे, पोपट दिवे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गोविंद दिवे, महंमद इनामदार, जावेद शेख, अण्णासाहेब घाडगे, संजय महाराज शेटे आदी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संचालक भाऊसाहेब खाटेकर, अनिल घाडगे, प्रकाश नालकर, सुभाष नालकर, तुषार गाडे, शंकर जाधव, संदीप घाडगे, अजय मुसमाडे, अण्णासाहेब गाडे , चिमाजी नालकर, बाळासाहेब गाडे यांच्यासह संस्थेचे सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन संचालक अण्णासाहेब शेटे यांनी केले, तर आभार व्हा. चेअरमन भाऊसाहेब घाडगे यांनी मानले.

## निधन

### निवृती ढवळे



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील निवृती केशव ढवळे ( वय ७६) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार असून जगदंबा रिवाईडिंग ईलेक्टीकचे आसाराम ढवळे यांचे वडील होत.

### कलावती शिंदे



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगांव येथील कलावती पाराजी शिंदे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने दु:खद झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार असून अकारी पडीत कृती समितीचे सदस्य भारत शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

## सेवा संकल्प अभियानाअंतर्गत वैजापूर विधानसभा मतदारसंघाचा दौरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर पश्चिम जिल्ह्याच्या वतीने आयोजित 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत वैजापूर विधानसभा मतदारसंघाचा दौरा जिल्हा प्रभारी तथा माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे व जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापर्वानिमित्त आयोजित या अभियानाच्या माध्यमातून सेवा, संघटन आणि जनसंपर्काचा संदेश देण्यात आला. नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय येथे नगरपालिकेच्या वतीने आयोजित वक्तृत्व, चित्रकला व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. ावेळी डॉ. प्रीतम मुंडे यांनी स्पर्धक, नागरिक आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यानंतर भाजपा संपर्क कार्यालयात संघटनात्मक आढावा बैठक घेण्यात आली. सेवा संकल्प अभियानाची अंमलबजावणी, आगामी संघटनात्मक उपक्रम, जनसंपर्क तसेच बूथस्तरावरील संघटन अधिक सक्षम करण्याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली. यावेळी कल्याण दांगोंडे, विशाल संचेती, रियाज शेख, मंजाहरी गाढे, जयश्री बागुल, संदीप ठोंबरे, मोहीनी बढे, वैशाली पवार,




अनिता तांबे, मनीषा व्यवहारे, नारायण कवडे, सुदाम भडके, दिनेश राजपूत, विनोद राजपूत, गणेश खैरे, सागर राजपूत यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गांधी जयंती पासून रोजगार सेवकांचा विविध मागण्यासाठी बेमुदत संप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** विविध प्रलंबित मागण्यांसाठी २ ऑक्टोबर पासून 'कामबंद आंदोलन' व बेमुदत संप पुकारणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवकांनी निवेदनात दिला आहे.

गंगापूर येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान- ग्रामीण (तइऋ्रठअचऋ) ची अंमलबजावणी यशस्वी व प्रभावीपणे राबविण्यात ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सहाय्यक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना १०० दिवसांचा हक्काचा रोजगार मिळवून देणे, मस्टर काढणे व भरणे, कामांचे नियोजन करणे, कुशल-अकुशल कामांचे समन्वय साधणे व प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे अशी अतिशय महत्त्वाची प्रशासकीय कामे ग्रामरोजगार सहाय्यक अविरतपणे करत आहे.



परंतु, ग्रामरोजगार सहाय्यक हे ग्रामस्तरावर अहोरात्र काम करत असतानाही त्यांच्या हक्काच्या व न्याय्य मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करून व शासनाने वेळोवेळी आश्वासने देऊनही प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही. यामुळे ग्रामीण भागातील योजना राबविणाऱ्या सर्व ग्रामरोजगार सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजी व असंतोष पसरला आहे.

०३ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची विनाविलंब संपूर्ण राज्यात व तालुका स्तरावर तातडीने प्रत्यक्ष अंमलबजावणी करुन कायमस्वरूपी मानधन : ग्रामरोजगार सहाय्यकांना दरमहा निश्चित, सन्मानजनक व कायमस्वरूपी मानधन लागू करण्यात यावे.मानधन थेट वैयक्तिक बँक खात्यावर (ृइढ डरे) वर्ग करणे : ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन ग्रामपंचायत स्तरावर प्रलंबित न ठेवता थेट त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यावर दरमहा विनाविलंब जमा करण्यात यावे.आरोग्य व अपघाती विमाकवच लागू करुन जाचक निकष व शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावेत.रोजगार हमी योजना व विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान- ग्रामीण(तइऋ्रठअचऋ) चे कामकाज पूर्णपणे बंद ठेवून 'कामबंद आंदोलन व बेमुदत संप पुकारणार असून या आंदोलनादरम्यान रोहयो अंतर्गत मस्टर काढणे, हजेरी नोंदवणे, मस्टरराभरणे, जिओ-टॅगिंग कैरणे अर्थवा योजनेशी

संबंधित कोणत्याही प्रकारची ऑनलाईन अथवा ऑफलाईन कामे बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा गंगापूर तालूका महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवकांनी निवेदनाद्वरे दिला आहे. निवेदनावर शकील शेख, सचिन थोरात, शिवाजी शिंदे, दत्तू वंजारे, बाळकृष्ण शिरसाठ, प्रदीप जाधव, अरुण जाधव, राहुल जाधव, कैलास नरोडे, सोमनाथ कोकरे, शंकर गुंडाळे, तुपसुंदर, काकासाहेब काकडे, अलीम शेख, भारतकुमार मते, केदार,संतोष गिरी, नंदू जाधव, विजय नरवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि. ०२ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | १६० १७९ ११५ | ४ | १५८ २४८ २२० | २ | ३४५ ३९० ३३६ |

१७-७०-६४-४५-६२-२९

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२० ३४६ ३३७ | ० | १९० २८० ४६० | १ | १४६ १२९ ११९ |

७३-३२-४०-०६-८१-१९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १४९ २३९ ५९० | ६ | १६९ २६८ ६०० | ७ | १७९ २७८ ७०० |

१४-४३-२६-६८-०७-७९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# द·ख·ल



## ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलमध्ये गांधी जयंती साजरी

**नगर तालुका :** महात्मा गांधी जयंतीनिमित्त धनगरवाडी येथील ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेत गांधीजींच्या विचारांना कृतीची जोड दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. महात्मा गांधी जयंतीनिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या वेशभूषेत सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी शाळा परिसरात स्वच्छता अभियान राबविले. महामानवांचे विचार केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या आचरणात यावेत यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. बालवयातच विद्यार्थ्यांमध्ये महामानवांप्रती आदर, प्रेम, सामाजिक बांधिलकी आणि एकोप्याची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे शाळा व्यवस्थापनाने सांगितले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या प्राचार्या तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय ऊशु स्पर्धेत प्रज्वल ढवळेचा सुवर्णवेध; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**श्रीगोंदा :** राज्यस्तरीय शालेय ऊशु स्पर्धेत श्रीगोंद्याच्या प्रज्वल छाया सुनील ढवळे याने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीगोंद्यातील विविध संघटना, क्रीडा संस्था आणि मान्यवरांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २८ व २९ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय शालेय ऊशु स्पर्धा घेण्यात आली. यावेळी घनश्याम अण्णा शेलार, माजी कृषी सहसंचालक दादाराम सप्रे, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, उपनगराध्यक्ष अलका अनुभुळे, विविध नगरसेवक, प्राचार्य साळवे, उपप्राचार्य थोरात, क्रीडा प्रशिक्षक डफळ, मखरे, फटे तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, उपाध्यक्ष नाना शिंदे, शिवाजीराव शेळके, गणेश पारे, संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमीचे संजय आनंदकर, सिद्धेश आनंदकर, जयेश आनंदकर, तसेच तालुका कृषी विक्रेते असोसिएशनचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रज्वलचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## शाहीर किनकर व चौरे यांना शाहीरी जीवन गौरव पुरस्कार



**टाकळी ढोकेश्वर :** जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथे छत्रपती शिवराय भेदिक शाहीरी राज्यस्तरीय मेळावा उत्साहात पार पडला यावेळी टाकळी ढोकेश्वर येथील शाहीर शांताराम किनकर व शाहीर अण्णासाहेब चौरे यांना 'कै. आमदार धोंडीभाऊशेठ पिंगट स्मृती जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.या पुरस्कार वितरण सोहळ्याला शाहीरी क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी प्रदीपशेठ पिंगट, शाहीर स्वप्निल गायकवाड,शाहीर तानाजी माळवदकर,सुनील डुक्रे,शाहीर शिवाजीराव कबडे आणि शाहीर भरत थोरात यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाहीरी ही केवळ करमणुकीची कला नसून छत्रपती शिवरायांचा पराक्रम,महाराष्ट्राची संस्कृती,सामाजिक प्रबोधन आणि इतिहास जनमानसापर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम आहे.छत्रपती शिवराय भेदिक मंडळाने शाहीरी परंपरेच्या जतनासाठी आणि राज्यस्तरीय मेळाव्यात शाहीरांच्या कार्यांचा सन्मान व गौरव केला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला सह्याद्री प्रतिष्ठान व सदनाना पतसंस्था यांच्या वतीने शाहीरी क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल महाराष्ट्रातील शाहीरांच्या योगदानाचा गौरव केला. त्यांच्या कलेला आणि कार्याला सलाम करणारा हा पुरस्कार सोहळा शाहीरी क्षेत्रासाठी विशेष अभिमानाचा क्षण ठरला.

## राघोहीवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची वार्षिक सभा उत्साहात



**शिराळ :** राघोहीवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष पदम शंकर होंडे यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात नुकतीच संपन्न झाली. गेली ६६ वर्षे तोट्याचा सामना करणाऱ्या या संस्थेने यंदा संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट नियोजनाच्या बळावर चिंचोडी सहकारी बँक क्षेत्रात प्रथम, तर तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या यशाच्या पार्श्वभूमीवर सभासदांना दिवाळीपूर्वी ९ टक्के लाभांश वाटप करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. सभेच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव रंगनाथ आंधळे यांनी मागील आर्थिक वर्षाचा हिशोब आणि ताळेबंद पत्रकाचे वाचन केले. त्यास उपस्थितांनी सर्वानुमते मंजुरी दिली. सभेदरम्यान संस्थेचा आर्थिक व्यवहार, कर्जवाटप, वसुली, शेतकरी-सभासदांच्या अडचणी आणि आगामी काळातील नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# कोरडगावकरांची तहान भागेना; पंधरा दिवसांनी नळाला पाणी!

### गावकऱ्यांची पाण्यासाठी वणवण; शनिवारी बाजारामुळे थांबलेल्या टँकरच्या खेपा रविवारी वाढवून देण्याची मागणी

**शिवाजी बोंद्रे । राष्ट्र सह्याद्री**




**कोरडगाव :** उन्हाची तीव्रता वाढत असतानाच कोरडगावात पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. गावातील नागरिकांना नळ योजनेचे पाणी तब्बल पंधरा दिवसांनी मिळत असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची मोठी धावपळ सुरू आहे. गावासह वाडी-वस्त्यांवरही टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असल्याने उपलब्ध पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण पडला आहे.

एकीकडे वाडी-वस्त्यांवरील नागरिकांची तहान भागविण्यासाठी टँकरच्या खेपा सुरू आहेत, तर दुसरीकडे गावातील नागरिकांना पंधरा-पंधरा दिवस पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे पाणी कुठून आणायचे? हा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा ठाकला आहे.

**शनिवारचा आठवडा बाजार ठरतोय पाणीपुरवठ्यात अडथळा**

कोरडगावचा शनिवारी आठवडा बाजार असल्याने त्या दिवशी टँकरच्या खेपा विहिरीपर्यंत जात नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. परिणामी शनिवारी होणाऱ्या काही खेपा शिल्लक राहतात. या शिल्लक खेपा रविवारी वाढवून देण्यात याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

शनिवारी बाजारामुळे टँकरच्या खेपा कमी होत असतील, तर दुसऱ्या दिवशी त्याची भरपाई करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पाणीटंचाईच्या काळात एकही खेप वाया जाऊ नये आणि प्रत्येक खेप नागरिकांपर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**टँकरच्या खेपा वाढवा; पंधरा दिवसांचे अंतर कमी करा!**

गावाची वाढती पाण्याची गरज, वाडी-वस्त्यांवरील पाणीपुरवठा आणि नळ योजनेतील मोठे अंतर पाहता सध्याच्या टँकरच्या खेपा अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे टँकरच्या खेपा तातडीने वाढवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

पंधरा दिवसांनी नळाला पाणी मिळत असल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी, स्वयंपाक, जनावरांसाठी पाणी आणि दैनंदिन गरजा भागविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी पाणीपुरवठ्याचे अधिक काटेकोर नियोजन करण्याची गरज आहे.

**ग्रामस्थांचा सवाल : पाण्यासाठी आणखी किती दिवस प्रतीक्षा?**

वाडी-वस्त्यांवरील नागरिकांना टँकरद्वारे पाणी देणे गरजेचे असले तरी गावातील नागरिकांच्या पाणीपुरवठ्याकडेही तितकेच लक्ष देणे आवश्यक आहे. शनिवारी शिल्लक राहिलेल्या टँकरच्या खेपा रविवारी वाढवून द्याव्यात, टँकरच्या एकूण खेपा वाढवाव्यात आणि नळ योजनेचे पाणी पंधरा दिवसांनी नव्हे तर अधिक नियमितपणे मिळावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असताना पंधरा दिवसांनी नळाला पाणी मिळत असल्याने कोरडगावातील पाणीप्रश्न आता प्रशासनासाठी गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे. संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मल्लिकार्जुनेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील मल्लिकार्जुनेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., घोटणची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयासमोर अध्यक्षा सौ. रुपाली संजय क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. सभेत विविध १३ विषयांवर सविस्तर चर्चा करून त्यांना सभासदांनी मंजुरी दिली.

सभेच्या प्रारंभी सभेची नोटीस वाचून मंजूर करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यास तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे आर्थिक पत्रक मंजूर करण्यास सभासदांनी मान्यता दिली. सन २०२६-२७ च्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, मागील वर्षी अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे, जनरल कॅशबुक पत्रक तयार करून मंजुरीस पाठविणे तसेच मंजूर कर्जाचे वितरण करण्याबाबत संचालक मंडळास अधिकार देण्यावर चर्चा झाली.

थकबाकीदार सभासदांकडील कर्जवसुलीसाठी कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला. तसेच सन २०२५-२६ च्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करून दोषदुरुस्ती अहवालास मंजुरी देण्यात आली. सन २०२६-२७ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्याबाबतही निर्णय घेण्यात आला.

संस्थेचे संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी यांना सहकार प्रशिक्षण देणे, संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम करून तोटा कमी करण्यासाठी उपविधीनुसार व्यवसाय करणे तसेच आगामी निवडणुकीबाबत सभासदांना माहिती देणे आदी विषयांवरही सभेत सविस्तर चर्चा झाली.

सभेचे इतिवृत्त सचिव भरत लंभाटे यांनी वाचून दाखविले. यावेळी लक्ष्मण टाकळकर, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय टाकळकर, डेव्हिड गंगावणे, प्रा. दादासाहेब ज्योतीक, विष्णू घुगे, रामजी क्षीरसागर, भारत मोटकर, नाना पाटील मोटकर, रामजी थोरवे, कारभारी थोरात, भाऊसाहेब मोटकर, भारत निकम, पिरमोहम्मद शेख, अशोक मोटकर, राजेंद्र घुगे, तुकाराम थोरवे आदींसह संस्थेचे संचालक, सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अण्णासाहेब शेलार यांचा इतर मागास मतदारसंघातून अर्ज

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**बेलवंडी :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध होणार असल्याच्या चर्चांना आता पूर्णपणे छेद मिळाला आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांनी देखील इतर मागासवर्गीय मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत आता चुरस निर्माण झाली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना अण्णासाहेब शेलार म्हणाले, जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी आणि माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी मिळावी हीच माझी प्रामाणिक इच्छा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही जागा विशिष्ट भागाकडेच राहिलेली आहे. मी अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात, विविध सेवा संस्था व साखर कारखान्यांमध्ये कार्यरत आहे. गेल्या निवडणुकीतही मी अर्ज भरला होता, मात्र सर्व ज्येष्ठ नेत्यांच्या आवाहनाला मान देऊन मी त्यावेळी माघार घेतली होती.

ते पुढे म्हणाले, सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी मिळणे गरजेचे आहे.

सर्वपक्षीय नेते माझ्या उमेदवारीचा सकारात्मक विचार करतील आणि मला बिनविरोध निवडून देतील अशी मला ठाम खात्री आहे.

जिल्हा बँकेच्या संचालक मंडळासाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. अर्जांची छाननी आणि माघारीच्या मुदतीनंतर प्रत्यक्ष निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होईल. मात्र, शेलार यांच्या उमेदवारीमुळे आता जिल्हा बँकेच्या वर्तुळात राजकीय घडामोडींना मोठा वेग आला आहे.

## जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूकीसाठी गीतांजली शेळके यांचे जोरदार शक्तिप्रदर्शन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका तथा जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजली उदयदादा शेळके यांनी गुरुवार दि.१ ऑक्टोबर रोजी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याकडे सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करुण आघाडी घेतली आहे. सोसायटी मतदारसंघातील बहुसंख्य मतदारांनी श्रीमती शेळके यांना संचालकपदाच्या निवडणुकीत उभे राहण्याची आग्रही मागणी केली होती. गुरुवारचा शुभमुहूर्तावर ताईंनी आज अर्ज दाखल केला यावेळी बहुसंख्य मतदार त्यांच्या समवेत निवडणूक कार्यालयात उपस्थित होते. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते सर, विद्यमान संचालक प्रशांत गायकवाड व सोनल गायकवाड यांनी विविध मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. गेली तीन वर्षे संचालक पदावर काम करताना ताईंनी पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देऊन जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळवून दिला आहे. गांजीभोयरे व पिंपरी जलसेन या दोन सोसायट्यांचा ठराव ताईंच्या नावाने करुन देण्यासाठी तेथील नेतेमंडळी व शेतकरी यांनी ताई यांनीच या निवडणुकीत उभे राहावे असा आग्रह केला होता. थोरात - विखे पाटील यांच्या युतीची चर्चा सध्या सुरू असून ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील नेतेमंडळी प्रयत्नशील आहेत मात्र गुरुवार पर्यंत फार मोठ्या संख्येने नेतेमंडळी व कार्यकर्ते यांनी अर्ज नेले असल्याने बिनविरोध निवडणूकीसाठी नेतेमंडळीचे प्रयत्न यशस्वी होतात काय याकडे लक्ष वेधले गेले आहे.

## पाणीप्रश्ना संदर्भात आज पालकमंत्री विखे व आ. राजळे यांच्या उपस्थितीत शेवगावात आढावा बैठक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीमुळे उद्भवलेली तीव्र पाणीटंचाई, तसेच शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांना जायकवाडी धरणाचे शाश्वत पाणी मिळावे याकरिता उद्या शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी दुपारी २:०० वाजता शेवगाव येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे एका विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब, शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजीव राजळे आणि जलसंपदा व इतर संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीत मतदारसंघातील टंचाई परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करणे आणि पूर्व भागातील गावांना जायकवाडी धरणातून पाणी मिळवून देण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहे. मतदारसंघातील पाणीप्रश्न आणि टंचाई परिस्थितीशी संबंधित शेतकरी, नागरिक व ग्रामस्थांनी आपल्या समस्या व मागण्या मांडण्यासाठी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सेवा सोसायटी मतदारसंघातून आ. दाते प्रशांत गायकवाड उमेदवारी अर्ज दाखल



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आ. काशिनाथ दाते यांनी गुरुवारी विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासोबत जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून, तर सोनल गायकवाड यांनी महिला राखीव मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी आ. काशिनाथ दाते यांच्यासह प्रशांत गायकवाड व सोनल गायकवाड उपस्थित होते. यावेळी पारनेर महायुतीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

यावेळी राहुल शिंदे, वसंत चेडे, सुधामती कवाद, सुषमा रावडे, अपर्णा खामकर, दिनेश बाबर, अशोक चेडे, पंकज कारखिले, सुभाष दुधाडे, दत्तानाना पवार, सुनील थोरात, विठ्ठल कवाद, बाळासाहेब नरसाळे, तेजस चौधरी, विकास रोहकले, ज्ञानेश्वर औटी, संतोष शेलार, लहू भालेकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आ. काशिनाथ दाते यांनी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचा निर्णय अंतिम मानून पुढील भूमिका राहील, असे स्पष्ट केले. जिल्हा बँक ही शेतकरी आणि सहकार क्षेत्राशी निगडित महत्त्वाची संस्था असल्याने व्यापक हिताचा विचार करून निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या चर्चेलाही त्यांनी दुजोरा दिला.

# गरजवंतासाठी रोटरी आधार वाटेल असे कार्य : अनिल तोरडमल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**कर्जत :** समाजाला गरज कशाची आहे. त्याचा शोध घेऊया. आणि ती गरज सर्वांच्या सहकार्याने कशी भागवली जाईल याची जबाबदारी योग्य पार पाडली की सामाजिक संघटनेचे खरे कार्य पार पडले याचे समाधान मिळते. आणि हे समाधान मोठ्या पुरस्कारापेक्षा ही आनंददायी राहील असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीचे नूतन अध्यक्ष अनिल तोरडमल यांनी केले. ते बुधवारी संध्याकाळी कर्जत रोटरी आयोजित सावित्रीच्या लेकी उपक्रमातर्गत मोफत सायकल, डिजिटल शाळेसाठी एलईडी संच आणि कंपोस्ट बॅरल वाटप प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी कर्जतचे पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड, प्राचार्य डॉ संजय नगरकर यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सामाजिक संघटन हे लोकोपयोगी असावे. वास्तविक पाहता त्याची रचनाच गरजवंतासाठी असून मागील अनेक वर्षांपासून रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटी या मार्गदर्शक तत्वावर काम करीत आहे. नूतन अध्यक्ष सेवानिवृत्त वन अधिकारी अनिल तोरडमल यांनी यंदा अभिनव संकल्पना राबवली. शालेय शिक्षणासाठी विद्यार्थिनींची होणारी पायपीट लक्षात घेता यंदा रोटरीने गरजवंत पाच विद्यार्थिनींना मोफत सायकल दिली. यासह डिजिटल शाळा उपक्रम हाती घेत कर्जत तालुक्यातील थेरवडी जिल्हा परिषद शाळेस एलईडी संच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. परिसर आणि घरातील कचरा अस्ताव्यस्त न टाकता त्याची योग्य साठवणूक करून त्याचा वापर शेतीसाठी जैविक पद्धतीने व्हावा या धर्तीवर ६ कंपोस्ट बॅरलचे वितरण गुरुवारी झाले. मोफत सायकलची चावी हाती पडल्यावर शालेय विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील समाधानाचे भावच कर्जत रोटरीसाठी कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा कमी नाही असे मत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड आणि प्राचार्य डॉ संजय नगरकर यांनी व्यक्त केले. समाजातील गरजवंतासाठी काम करण्याचा जो अभिनव उपक्रम हाती घेतला त्यास शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक सचिव संतोष सुरवसे यांनी केले. यावेळी माजी अध्यक्ष रामदास काळदाते, विशाल मेहेत्रे, डॉ संदीप काळदाते, डॉ अद्वैत काकडे, डॉ सुरेंद्र जवणे, दयानंद पाटील, राजेंद्र जगताप, उपमन्यू शिंदे, राजेंद्र पठाडे, नितीन देशमुख, मुन्ना पठाण, गणेश जेवरे, चंद्रकांत राऊत आदी उपस्थित होते.

**वाहून गेलेला समर्थसागर बंधारा पुन्हा नव्याने उभारला**

२०१६ साली रोटरीने उभारलेला समर्थसागर बंधारा मागील वर्षीच्या अतिवृष्टीत वाहून गेला होता. अनिल तोरडमल यांनी रोटरीचे सूत्र हाती घेताच त्या बंधाऱ्याचे पुनरुज्जीवन करीत भराव टाकीत कार्यान्वित केला. हा समर्थसागर बंधारा रास्तारोको आंदोलनात आणि सदगुरु गोदड महाराज रथयात्रेच्या गर्दीच्या काळात वाहतुकीत पर्यायी मार्ग म्हणून महत्वाची भूमिका बजावतो.

## दखल

### चारचाकीच्या धडकेत महिलेचा मृत्यू



**कळंब :** पुणे-नाशिक महामार्गावर कळंब येथील दत्तनगर परिसरात भरधाव इनोव्हा कारने धडक दिल्याने पायी जाणाऱ्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना बुधवारी रात्री घडली. स्वाती संजय भालेराव वय ४४, रा. कळंब, ता. आंबेगाव असे मृत महिलेचे नाव आहे.

३० सप्टेंबर रोजी रात्री पावणेसातच्या सुमारास स्वाती भालेराव दूध घालण्यासाठी पुणे-नाशिक महामार्गालगतून पायी जात होत्या. त्यावेळी नारायणगावकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या इनोव्हा कारने त्यांना धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या अपघातात इनोव्हा वाहनाचेही नुकसान झाले. याप्रकरणी मृत महिलेचे पुतणे सौरभ सुनील भालेराव यांनी मंचर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार इनोव्हा चालक हर्ष बाबाजी थिटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मंचर पोलिस करीत आहेत.

### आळंदीत १,६८३ जणांची महास्वच्छता मोहीम

**आळंदी :** 'स्वच्छता ही सेवा २०२६' आणि 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत आळंदी नगरपरिषदेच्या वतीने 'एक दिवस, एक साथ, एक तास' या संकल्पनेतून गुरुवारी महास्वच्छता मोहीम राबविण्यात आली. इंद्रायणी नदी घाट परिसरासह शहरातील विविध शाळांच्या परिसरात झालेल्या या मोहिमेत विद्यार्थी, शिक्षक, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छता कर्मचारी असे एकूण १ हजार ६८३ जण सहभागी झाले.

या वेळी आळंदी नगरपरिषद नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक रामभाऊ भोसले यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. ज्ञानेश्वर शिक्षण संस्था पदाधिकारी अजित वडगावकर, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापक विजय गुळवे यांच्यासह विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी सहभाग घेतला.मोहिमेत इंद्रायणी नदी घाट परिसर तसेच शाळांच्या परिसरातील कचरा संकलन, साफसफाई आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.

ज्ञानेश्वर विद्यालय, एमआयटी कॉलेज, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल, ज्ञानसाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, श्री निकेतन गुरुकुल विद्यालय, भिमाबाई सोपानराव उपाध्ये इंग्लिश मीडियम स्कूल आणि आळंदी नगरपरिषद शाळेतील विद्यार्थी मोहिमेत सहभागी झाले. शैक्षणिक संस्थांमधील १ हजार ६०३, तर नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी असे ८० जण सहभागी झाले.स्वच्छता ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी. आळंदी शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी सातत्याने स्वच्छता उपक्रम राबविण्यात येतील, असे आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले.

### निरगुडसर परिसरात बटाटा पीक जोमात



**मेंगडेवाडी येथे जोमात आलेले बटाटा पीक दाखविताना शेतकरी हनुमंत टाव्हरे.**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील निरगुडसर, मेंगडेवाडी, पोंदेवाडी, जारकरवाडी आणि लाखणगाव परिसरात शेतकऱ्यांनी यंदा मोठ्या प्रमाणावर बटाटा लागवड केली आहे. सुरुवातीला पावसाअभावी बटाटा उत्पादक शेतकरी चिंतेत होते. मात्र, परतीच्या पावसामुळे बटाटा पिकाला दिलासा मिळाला असून सध्या पीक जोमात आले आहे.

काही शेतकऱ्यांनी लवकर लागवड केली असून काहींची लागवड अद्याप सुरू आहे. या भागात पाण्याची मुबलक उपलब्धता असल्याने बटाटा उत्पादन चांगले मिळण्याची शक्यता आहे. मात्र, बियाण्यांच्या दरात वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे बटाट्याला चांगला बाजारभाव मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

सप्टेंबरच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात काढणीला येणारे पीक अद्याप शेतात असल्याने काही प्रमाणात काढणीला उशीर होणार आहे. बटाटा हे या परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे नगदी पीक असल्याने त्यावर त्यांचे आर्थिक गणित अवलंबून आहे. आगामी काळात पाऊस योग्य प्रमाणात झाल्यास उत्पादन चांगले मिळेल, अशी अपेक्षा मेंगडेवाडी येथील बटाटा उत्पादक शेतकरी हनुमंत टाव्हरे यांनी व्यक्त केली.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाचा मार्ग मोकळा

### उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संपादनाला विरोध करणारी व विमानतळाची जागा बदलण्याची मागणी करणारी शेतकऱ्यांची याचिका उच्च न्यायालयाने दि. २२ सप्टेंबर रोजी फेटाळली. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, जागेची निश्चिती करणे हा सर्वस्वी तांत्रिक तज्ज्ञांच्या अखत्यारीतील विषय व शासनाच्या धोरणाचा भाग आहे. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी न्यायालय हे तज्ज्ञ प्राधिकरण नाही.

**जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे आवाहन:**
**पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून खूप मोठे पॅकेज दिले आहे. माझी सर्व शेतकरी बांधवांना विनंती आहे की, दिलेल्या वाढीव मुदतीत आपण संमती देणे हे आपल्या हिताचे आहे. संमतीच्या संपादनाने आपणांस १० टक्के परतावा व पुनर्वसन धोरणाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ देण्यात येणार आहेत. सामाईक शेतकऱ्यांनी आपापले वैयक्तिक प्रश्न सोडवून नुकसानभरपाईची रक्कम स्वीकारावी, जेणे करून सदर रक्कम न्यायालयीन प्रक्रियेत अडकू नये .**

याचिकाकर्ते भूसंपादन किंवा नुकसानभरपाई संदर्भात संबंधित प्राधिकरणांकडे दाद मागू शकतात. तसेच, संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार त्यांना देण्यात येणारी नुकसानभरपाई योग्य किंवा कायद्यानुसार नसल्यास, त्याविरुद्ध ते आव्हान देऊ शकतात. याचिकाकर्त्यांच्या locus standi (दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार) प्रश्नाचा विचार करता, राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयाला आव्हान देण्यासाठी याचिकाकर्त्यांना आवश्यक कायदेशीर अधिकार (locus) नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

शासनाने निश्चित केलेल्या जागेवरील भूसंपादन प्रक्रिया अतिशय शीघ्र गतीने पूर्ण करण्यात येत असून, वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपुर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या गावांतील ९६ टक्के शेतकऱ्यांनी संमती दिलेली आहे. अद्यापपर्यंत ९१० हेक्टर क्षेत्राच्या संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असून, सुमारे ३८७५ कोटी रुपये एवढा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शीघ्र गतीने लाभ मिळावा म्हणूनच संपादनाची कार्यवाही अतिशय वेगाने करण्यात येत असून, नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने सर्वाधिक दराचे पॅकेज या प्रकल्पाला दिल्यामुळे व पुनर्वसन धोरणामुळे शेतकऱ्यांचे कल्याण साधण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जमिनीच्या वादांचेही शासनाकडून निराकरण करण्यात येत आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या पुनर्वसन धोरणाचा खरा लाभ शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे आणि म्हणूनच स्थानिक शेतकऱ्यांच्या हितासाठी वाढीव मुदत देण्यात येत आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत संमती दिली नाही, त्यांना संमती देण्यासाठी २५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबरपर्यंत स्थानिक शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मुदतवाढ देण्यात येत असून, सर्व संपादन प्रक्रिया २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

मात्र, १० ऑक्टोबरनंतर उर्वरित जमिनींसाठी सक्तीने भूसंपादन करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी सक्तीने भूसंपादन होईल, तेथे पुनर्वसन धोरणाचा लाभ देय होणार नाही.

## आश्वासन नको, थेट निर्णय हवा; अभाविपचे बेमुदत उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी 'कॅप' प्रक्रियेबाहेरून प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय तसेच विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची बंद केलेली शिष्यवृत्ती पूर्ववत सुरू करण्याबाबत तातडीने शासन निर्णय काढावा, या मागणीसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने येरवडा येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या कार्यालयासमोर मंगळवारपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात पुण्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील १५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

'कॅप' प्रक्रियेबाहेरून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, यासाठी अभाविपने यापूर्वी निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलने केली आहेत. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून शासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून अद्याप ठोस शासन निर्णय झालेला नाही. त्यामुळे संघटनेने शासनाला २८ सप्टेंबरपर्यंत निर्णय घेण्याची अंतिम मुदत दिली होती. मुदतीत निर्णय न झाल्याने २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता उपोषण सुरू करण्यात आले.उपोषणस्थळी विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत शिष्यवृत्तीचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. आंदोलनात प्रदेश सहमंत्री ओम माळुंजकर, प्रेम तानावडे, गोविंद शेटे आणि रुद्र कोळपकर यांच्यासह विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

शासनाने केवळ चर्चा आणि आश्वासने न देता तातडीने परिपत्रक काढून कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी आणि प्रदेश सहमंत्री ओम माळुंजकर यांनी दिला.

**विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या**
- **'कॅप' प्रक्रियेबाहेरून प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती**
- **प्रवर्गातील विद्यार्थ्यांची बंद केलेली शिष्यवृत्ती पूर्ववत सुरू करून तातडीने शासन निर्णय काढावा.**
- **निर्णय होईपर्यंत महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांकडे संपूर्ण शुल्क भरण्याची सक्ती करू नये, तसेच विद्यार्थ्यांवरील मानसिक दबाव थांबविण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत.**
- **मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही 'कॅप' प्रक्रियेबाहेरील प्रवेशासाठी शिष्यवृत्ती आणि इतर शैक्षणिक सवलतींचा लाभ देण्याबाबत निर्णय घ्यावा.**





## मंचर बसस्थानकात दागिने चोरणारे तिघे अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत महिलांच्या अंगावरील तसेच पिशवीतील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघांना मंचर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून साडेतीन तोळे सोन्याचे दागिने आणि इतर मुद्देमाल असा एकूण ४ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मंचर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत महिलांचे दागिने चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत होत्या. या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त तपास पथक नियुक्त करण्यात आले होते. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू असताना २४ सप्टेंबर रोजी संशयित आरोपी मंचर बसस्थानकात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.त्यानुसार पोलिसांनी अशोक बबन भोसले, अश्विनी अविनाश भोसले आणि चोरीचे सोने खरेदी करणारे सतीश मधुकर गोरे यांना अटक केली. तपासात आरोपींनी मंचर, खेड आणि नारायणगाव पोलिस ठाण्यांच्या हद्दीत चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## एक एकर टोमॅटोमधून चार लाखांचा नफा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**चांगल्या रोपांमुळे पिकाला बळ :**
**बोरा हायटेक नर्सरीचे संचालक संजय चव्हाण यांनी सदृढ रोपे तयार करून दिल्याचे सांगितले. कंपनीचे विभागीय प्रमुख योगेश जाधव यांनी शेतकऱ्यांना बियाण्यासोबत तांत्रिक मार्गदर्शनही केले जाते, असे सांगितले.**

**सासवड :** पाण्याची टंचाई असतानाही आधुनिक तंत्रज्ञान, काटेकोर नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर शेतीत भरघोस उत्पादन घेता येते, हे पुरंदर तालुक्यातील टेकवडी येथील तुकाराम इंदलकर आणि दत्ता इंदलकर यांनी दाखवून दिले आहे. त्यांनी केवळ एक एकर क्षेत्रात टोमॅटोचे पीक घेत सुमारे चार लाख रुपये निव्वळ नफा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

इंदलकर यांनी रवी हायब्रीड सीड्सच्या आरव्हीएमटीओ ३८४८ या वाणाची निवड केली. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारी, एकसमान आकाराची, आकर्षक लाल रंगाची आणि जास्त काळ टिकणारी फळे हे या वाणाचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.

जून महिन्यात बियाणे घेतल्यानंतर बोरा हायटेक नर्सरीमध्ये २५ ते २७ दिवसांत रोपे तयार करण्यात आली. शेतात खोल नांगरणी, गादीवाफे, शेणखत, निंबोळी पेंड आणि आवश्यक खतांचा वापर करण्यात आला. पाण्याची बचत करण्यासाठी ठिबक सिंचन आणि जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी आच्छादन कागदाचा वापर करण्यात आला. १७ जुलै रोजी रोपांची लागवड करण्यात आली. त्यानंतर ठिबकद्वारे नियमित खत व्यवस्थापन, रोग-किडींचे नियंत्रण आणि तारकाठीच्या मंडपावर वेलींची बांधणी करण्यात आली. ऑगस्टमध्ये टोमॅटोचे दर घसरले असतानाही इंदलकर यांनी बागेची निगा कायम ठेवली. सुमारे ६० दिवसांनंतर तोडणी सुरू झाली. गेल्या आठवड्यात शेवाळेवाडी बाजारात ११० कॅरेट म्हणजे सुमारे २२०० किलो टोमॅटो विक्रीस पाठविण्यात आले. त्यास कॅरेटला ४०० ते ४२५ रुपये दर मिळाला. फळांची गुणवत्ता चांगली असल्याने इतर मालाच्या तुलनेत २० ते ४० रुपये अधिक दर मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.सध्या प्रत्येक झाडावर १० ते १२ किलो टोमॅटो असून, सात हजार झाडांपासून सुमारे १५०० कॅरेट उत्पादन अपेक्षित आहे. मशागत, रोपे, खते, फवारणी व वाहतूक यासाठी सुमारे दोन लाख रुपये खर्च झाला असून, चार लाख रुपये निव्वळ नफा मिळण्याची अपेक्षा आहे.

## पुरंदरच्या शेतकऱ्यांचे अनुदान तातडीने देण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सासवड :** पुरंदर तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांचे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे हप्ते बंद झाल्याने तसेच कृषी अवजारे खरेदी करूनही अनुदानाची रक्कम मिळाली नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. या प्रश्नाकडे राजेवाडी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र शिंदे आणि शेतकरी महादेव विठ्ठल जगताप यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे लक्ष वेधले.

शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून कृषी अवजारांच्या अनुदानासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून अवजारे खरेदी केली आहेत. मात्र कार्यालयीन दिरंगाई आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने अनुदान मिळालेले नाही. याबाबत कृषिमंत्र्यांकडे लेखी निवेदन देऊन प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनाची दखल घेत कृषी विभागाचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यानंतर पुरंदर तालुका कृषी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून प्रलंबित प्रस्तावांचा तपशील मागविण्यात आला. किरकोळ त्रुटींमुळे प्रलंबित असलेल्या अर्जदारांना मार्गदर्शन करून त्रुटी दूर कराव्यात आणि पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम तातडीने जमा करावी, अशा सूचना देण्यात आल्या. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

## सासवडमध्ये रंगले राजकीय साहित्य संमेलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** साहित्य आणि राजकारण हे परस्परांना समृद्ध करणारे असून, साहित्यातून राजकारणाला नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेच्या माजी उपाध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड, जेजुरी आणि सोपाननगर शाखांच्या संयुक्त विद्यमाने दहावे नांदी संमेलन उत्साहात झाले. यंदाच्या संमेलनाचे 'राजकीय साहित्य संमेलन' असे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप होते. अध्यक्षस्थानावरून डॉ. गोऱ्हे बोलत होत्या.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, साहित्य संमेलनात राजकारण्यांना आणू नये, अशी चर्चा होते. मात्र सासवड येथे राजकीय साहित्य संमेलन आयोजित करणे हे वैशिष्ट्यपूर्ण पाऊल आहे. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी साहित्य आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत प्रभावी काम केले. महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांसारख्या नेत्यांनीही लेखनातून समाजाला विचार आणि दिशा दिली. सध्याच्या काळात राजकारणी फारसे लिखाण करताना दिसत नाहीत, ही खंत आहे. समाज माध्यमांवरील भाषेकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. तेथील भाषा उद्याच्या पिढीची बोली बनत आहे.महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण आणि कार्यवाह सुनील महाजन यांनी विचार मांडत पुण्यात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले. स्वागताध्यक्ष विजय कोलते यांनी सासवडच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेची माहिती दिली. नगराध्यक्षा आनंदी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, प्रभाकर ओव्हाळ, राजेंद्र लाखे, अण्णासाहेब खाडे, डॉ. राजेश दळवी, मुख्याध्यापक नंदकुमार सागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# जेजुरीत बंधन कोनगरच्या अति दरिद्र सहाय्यक समितीचे प्रशिक्षण

मयुर कुदळे । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** बंधन कोनगरच्या जेजुरी शाखेच्या वतीने अति दरिद्र सहाय्यक समितीच्या सदस्यांसाठी मंगळवारी (ता.२९) प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जेजुरी परिसरातील विविध गावांतील मान्यवर तसेच बंधन कोनगरचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शाखा प्रभारी पर्वत सिंह राठोड यांनी प्रशिक्षणादरम्यान संस्थेच्या माध्यमातून जेजुरी ब्लॉकमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. विशेषतः कमी वयात विधवा झालेल्या, उत्पन्नाचे साधन नसलेल्या तसेच आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरजू महिलांच्या कुटुंबांना रोजगाराच्या माध्यमातून आधार देण्याचे काम संस्थेकडून करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जेजुरी ब्लॉकमधील विविध गावांमध्ये आतापर्यंत सुमारे २०० अति गरीब कुटुंबांना विनामूल्य रोजगारासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. लाभार्थ्यांच्या कार्यान्वयनाचा आढावा घेण्याबरोबरच त्यांना उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांशी जोडण्याबाबत प्रशिक्षणात चर्चा करण्यात आली. तसेच केंद्र सरकारच्या उद्यम नोंदणी प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

बंधन कोनगर संस्था देशातील १६ राज्यांमध्ये, ८२ जिल्ह्यांमध्ये, १० हजार ३४१ ब्लॉक आणि ३१ हजार ५७१ गावांमध्ये कार्यरत असल्याची माहिती राठोड यांनी दिली. आतापर्यंत २ लाख १८ हजार ६२५ लाभार्थ्यांना संस्थेच्या उपक्रमांचा लाभ मिळाला असून देशभरात २५८ कोटी ६५ लाख २२ हजार ६१७ रुपयांचे साहित्य विनामूल्य वितरित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी वरिष्ठ एसी शहाबुद्दीन मौला, एसी योगेंद्र कुमार, समाजसेवक नवनाथ चौंडकर,शाखा प्रभारी पर्वत सिंह राठोड, फील्ड समन्वयक वर्षा खेसे, कोमल झगडे, जानवी सोनवणे, कोमल अहिरे यांच्यासह विविध गावांतील मान्यवर उपस्थित होते.



# द•ख•ल




## प्रल्हाद पाठक यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार प्रदान

**शेवगाव :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२६ शेवगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रल्हाद अनंत पाठक व कनिष्ठ अभियंता शैलेश विष्णू साबळे यांना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. मंगळवार दि. २९ रोजी मुंबईत यशवंतराव चव्हाण सभागृहात अभियंता गौरव समारंभ दिमाखात संपन्न झाला. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस दरवर्षी अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. गौरव चिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. उपविभागीय अभियंता पाठक तसेच कनिष्ठ साबळे यांनी शेवगाव उपविभागात रस्ते, इमारती व पुलांची कामे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व गुणवत्ता राखून केल्याने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव ( रस्ते ) शरद राजभोग, सचिव ( बांधकामे ) आबासाहेब नागरगोजे तसेच प्रशांत औटी (सचिव प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना), अरुंधती शर्मा (मुख्य अभियंता (सा.बां.प्रादेशिक विभाग नाशिक), विवेक माळुंदे (अधिक्षक अभियंता अहिल्यानगर), लक्ष्मीकांत जाधव व युवराज कोकरे (कार्यकारी अभियंता अहिल्यानगर) व सर्व मुख्य अभियंता, वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कारार्थी पाठक व साबळे यांचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील, माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## गोरेश्वर पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न




**पारनेर :** संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या गोरेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सौ. प्रिती संकेत पानमंद यांच्या अध्यक्षतेखाली आंबेडकर भवन, पारनेर येथे सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या सुरुवातीला संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संतोष सुंबे यांनी विषय पत्रिकेचे वाचन व मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले. त्यानंतर सभेपुढील १ ते १० विषय संचालकांनी सर्व सभासदांच्या मंजुरीसाठी ठेवले असता, उपस्थितांनी त्या सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी दिली. संस्थेची प्रगती आणि विश्वासार्हता वाढतेय: बाजीराव पानमंद यावेळी मार्गदर्शन करताना संस्थापक अध्यक्ष तथा संचालक श्री. बाजीराव पानमंद म्हणाले की, मागील आर्थिक वर्षात जुलै अखेरपर्यंत संस्थेवर प्रशासक नियुक्त होते. परंतु, जून महिन्यात संस्थेची पंचवार्षिक निवडणूक पार पडून नवीन संचालक मंडळ स्थानापन्न झाले. तेव्हापासून आजतागायत सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग संस्था व्यवहार सुरळीत करण्यासाठी एकजुटीने काम करत आहेत. या सभेस संचालक श्री. आप्पा थोरात, चंद्रभान शेलार, शिवाजी नरसाळे, सखाराम खोडदे, दामु टकले, प्रशांत चौरे, बाळासाहेब बोऱ्हाडे, संचालिका सौ. स्नेहल आमले तसेच सभासद श्री. भाऊसाहेब भुसारी, संकेत पानमंद, बाबासाहेब तांबे, शिवाजी शिंदे, दत्तात्रय गवळी, भिकाजी जगदाळे, बन्सी ठुबे, शिवाजी कऱ्हे, दत्तात्रय कऱ्हे, इसाक शेख, प्रवीण नरसाळे, उमेश नरसाळे, सुशांत पानमंद यांच्यासह बहुसंख्येने सभासद व ठेवीदार उपस्थित होते.

## समर्थ क्रीडा संकुलात जुन्नर तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा उत्साहात सपन्न



**निघोज :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना तसेच समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बांगरवाडी–बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा समर्थ क्रीडा संकुल, बेल्हे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेत जुन्नर तालुक्यातील शाळांमधील १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील १८४ मुला–मुलींच्या संघांनी सहभाग घेतला.

## श्री जगदंबा विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी



**राशीन :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री जगदंबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राशीन येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९ वा जयंती सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाहूराजे राजेभोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड, उद्योजक मेघराज बजाज, बापू सुखदेव धोंडे, तर प्रमुख उपस्थितीत उद्योजक रामदास सलगर, बिभीषण जंजिरे व भास्कर मोढळे उपस्थित होते. प्रमुख वक्ते प्रा. अजित खरसडे (श्रीगोंदा) यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास स्थानिक स्कूल कमिटीचे रामकिसन साळवे, ज्ञानेश्वर (माऊली) सायकर, विक्रम राजेभोसले, तसेच अशोक जंजिरे, दादासाहेब परदेशी, मालोजीराजे भिताडे, एम.डी. कानगुडे, मधुकर दंडे, रुद्र दादा राऊत, अंबादास गव्हाणे, अंकुश साळवे, विजय साळवे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी, पालक, माजी विद्यार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोहटादेवी नवरात्रोत्सव नियोजन बैठक

# दांडी बहाद्दरांना कारणे दाखवा नोटीस : प्रांताधिकाऱ्यांचे आदेश

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** आपण बैठकीसाठी आलो याची कल्पना तुम्हाला नाही का कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी साहेबांबरोबर बोलतो असे उत्तर देणार असेल तर तुम्ही येथे कशाला आलात साहेबांना पाठवायचे अशा पद्धतीचे वर्तन योग्य नाही. अशा शब्दात प्रांत अधिकारी तथा मोहटादेवी शारदीय नवरात्र उत्सव यात्रा समितीचे नोडल अधिकारी प्रसाद मते यांनी कर्मचाऱ्यांची कान ऊघडणी केली. राज्यातील नवरात्रोत्सवातील प्रमुख उत्सवांपैकी एक म्हणून मोहटादेवीच्या यात्रेकडे बघितले जाते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. यात्रा कालावधीमध्ये यात्रा प्रमुख म्हणून प्रांताधिकारी काम पाहतात. बुधवारी नियोजनासाठी विविध विभाग प्रमुखांची बैठक मोहटादेवीच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली पूर्व सूचना देऊनही या बैठकीला वनपरिक्षेत्र अधिकारी अन्न व औषध प्रशासन विभाग राष्ट्रीय महामार्ग तसेच गटविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे आदेश प्रांत अधिकारी यांनी दिले. यंदा पाणीटंचाईची तीव्रता वाढणार असल्याने तात्पुरत्या स्वरूपात हंडाळवाडी येथील पालिकेच्या पाणीपुरवठा विहिरीतून देवस्थानचे टँकर भरण्याबाबत प्रांत अधिकारी यांनी संमती दिली.

बैठकीला तहसीलदार उद्धव नाईक सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे एस. सी . लाड वनविभागाचे बबन मंचरे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपाय अभियंता सय्यद परिवहन विभागाचे प्रतिनिधी महावितरणचे उप अभियंता अरविंद कुकडे, देवस्थान समितीचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, अशोक दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, बाळासाहेब लाहोटी, बाबासाहेब दहिफळे, माजी सरपंच मनीषा पालवे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

शारदीय नवरात्र उत्सव कालावधीमध्ये तिसगाव, पाथर्डी शहर व तेथून मोहटादेवी गडापर्यंत वारंवार वाहतूक कोंडी होते. रस्त्याच्या दुतर्फा असलेली अस्थाई स्वरूपाची सर्व अतिक्रमणे हटवून रस्ता वाहतूक योग्य ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला मोठे गाव वडाच्या परिसरातील ही अतिक्रमणे हटविण्यासाठी वाढीव पोलीस बंदोबस्त देण्यात या आश्वासन उपस्थित अधिकाऱ्यांनी दिले. वनविभागाच्या सात तारीख केली. वनविभागाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत वनविभागाकडूनच चाल ढकल होत असून संबंधित अधिकाऱ्यांची अतिक्रमण हटविण्याची इच्छा दिसत नाही. अशी चर्चा झाल्याने वनविभागाकडून ज्या दिवशी बंदोबस्त मागितला जाईल त्या दिवशी बंदोबस्त पुरवण्याचे आदेश प्रांत अधिकाऱ्यांनी पोलीस विभागाला दिले. तालुक्यामध्ये खडी व अन्य खनिजाची वाहतूक करणाऱ्या बहुतेक गाड्यांना नंबर प्लेट नाहीत, अनेक चार चाकी गाड्यांच्या काचा काळ्या रंगाच्या आहेत, अनेक दुचाकी बिगर नंबर प्लेटच्या राजरोस फिरतात. काही गाड्यांच्या नंबर प्लेट प्लेटवर नंबर सोडून दुसराच मजकूर आढळतो. याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाने ठोस कारवाई करावी. मुदतबाह्य झालेल्या गाड्या रस्त्यावर राजरोस धावतात. यांची तपासणी नेमकी कोणी करायची असा सवाल प्रांताधिकार्यांनी परिवहन अधिकाऱ्यांना विचारत तातडीने नियमानुसार कारवाई करा. अधिकाऱ्यांच्या गाड्या अडवून त्यांच्याकडून विविध प्रकारच्या कागदपत्रांची मागणी केली जाते, मात्र अशा प्रकारच्या गाड्या राजरोस डोळ्यापुढून जात असताना त्यांना थांबवून त्यांची चौकशी करून कारवाई कोणी करायची हा नेमका प्रकार बंद झाला पाहिजे. अशा सूचना मिळताच उपस्थित अधिकाऱ्यांनी पंधरा दिवसाचा तालुक्याचा कॅम्प सुरू करून सर्वच वाहनांची तपासणी वाहन चालवण्याचा परवाना आदींबाबत कारवाई सुरू केली जाईल असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.विक्रम वाडेकर तर सूत्रसंचालन करून ईश्वर गायकवाड यांनी आभार मानले.

## राक्षीच्या पाणीप्रश्न : अधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** राक्षी गावातील प्रलंबित पाणीप्रश्नासाठी दिनांक १ ऑक्टोबर रोजी दुसऱ्यांदा रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. पाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेकडो शेतकरी, महिला, युवक व ग्रामस्थांनी या आंदोलनात सहभाग घेतला. आंदोलनस्थळी ताजनापूर लिफ्ट क्र. २चे उपविभागीय अभियंता श्री. उपाध्ये साहेब, श्री. कुलकर्णी साहेब व श्री. आगलावे साहेब यांनी उपस्थित राहून आंदोलकांशी चर्चा केली. यावेळी अधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे आश्वासन दिले की, ५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत लिकेज झालेल्या ठिकाणांची दुरुस्ती करून पाणी बाजार तलावापर्यंत पूर्णपणे पोहोचविण्यात येईल. तसेच इतर तांत्रिक कामे पूर्ण करून पाझर तलाव व गावातील बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

**राक्षीच्या पाण्यासाठी दोन वेळा रस्ता रोको आंदोलन करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. प्रशासनाकडून वारंवार आश्वासने मिळत आहेत; मात्र शेतकऱ्यांना अद्याप पाणी मिळालेले नाही. आता तरी संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन दिलेल्या लेखी आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करावी आणि राक्षीच्या पाणीप्रश्नाकडे झालेली ही निष्काळजीपणा तातडीने दूर करावा.**

आंदोलनावेळी श्री. अतुल जुंबड यांनी शेतकरी व ग्रामस्थांची बाजू ठामपणे मांडत पाणीप्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. आंदोलनाच्या ठिकाणी झडख सानप साहेब, पोलीस नाईक बडे दादा, अंगारक दादा, गोपनीय शाखेचे वाघ दादा तसेच इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

या आंदोलनात आप्पासाहेब जुंबड, विष्णू कातकडे, रावसाहेब कातकडे, कृष्णा जुंबड, बाबू शेख, भारत कातकडे, अफसर शेख, गुलाब मगर, जनाहरी मगर, नामदेव जुंबड, पंडित जुंबड, घनश्याम मगर, हैदर शेख, शिवाजी गाडे, राहुल जुंबड, सागर जुंबड, अमोल जुंबड, परसराम गव्हाणे, किशोर कर्डिले, ज्ञानदेव कातकडे, विकास गायकवाड, शंकर जुंबड, प्रदीप भोरजे, आजिनाथ वीर, आजिनाथ जुंबड यांच्यासह शेकडो शेतकरी, महिला भगिनी, युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## हातगावात अंगणवाडी सेवा पंधरवडा कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** भारतीय जनता पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून राज्यातील सुमारे ५० हजार अंगणवाड्यामधे २५ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २६ पर्यंत अंगणवाडी सेवा पंधरवाडा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील व आमदार मोनिकाताई राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील ६ अंगणवाड्यांमध्ये आमदार चित्रा वाघ यांनी पंधरवाडा काळात जे कार्यक्रम निश्चित करून दिलेले आहेत त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असल्याबाबतची माहिती मंदाकिनी मुरकुटे यांनी दिली. त्या म्हणाल्या की, ग्रामीण भागासह शहरी भागात कार्यरत असलेल्या अंगणवाड्या ह्या लहान बालकांच्या दृष्टीने महत्वाच्या समजल्या जात असून राज्यात आ. चित्रा वाघ यांनी अंगणवाडी विषयावर जो पंधरवाडा सुरू केलेला आहे तो निश्चितच प्रेरणादाई कार्यक्रम असल्याचे म्हटले आहे. या कार्यक्रमासाठी डॉ. निलेश मंत्री, पद्माताई मंत्री, प्रा. भाऊसाहेब मुरकुटे, मंदाकिनी अभंग, शाम बुटे, निवृत्ती नाचण, शिंदेमामा, शारदा गोरक्ष कदम, तनुजा मुरकुटे, गंगाधर शेंगुळे, संजय दारूणकर, संजय उंदरे, सोमनाथ भांडवलकर, गवळी मॅडम, तुषार मुरकुटे, अनिकेत मुरकुटे व ग्रामस्थांसह अंगणवाडी सेविका अशाबी युसुफ पठाण, बेबीताई रावसाहेब निकाळजे, भक्ती हरिभाऊ अभंग, सुरेखा दत्तात्रय गाढे, निकिता दत्तात्रय आंबेकर, राधा नवनाथ भालेराव, यांच्यासह मदतनीस कोमल गुंजाळ, लता अभंग, स्वाती जऱ्हाड, अनुराधा दिवटे उपस्थित होते.

## आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### कर्जत–जामखेडमधील तरुण तरुणींना रोजगाराची संधी

**जामखेड :** कर्जत–जामखेड मतदारसंघातील तरुण–तरुणींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आ. रोहितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बारामती ग्रो लिमिटेड व कर्जत–जामखेड एकात्मिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग यांच्या सहकार्याने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

कर्जत–जामखेड मतदारसंघातील युवकांना रोजगाराच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध औद्योगिक क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामुळे स्थानिक तरुणांना आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी मिळणार असून, पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्याचे आयोजन कर्जत येथे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दादा पाटील महाविद्यालय येथे, तर जामखेड येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागेश विद्यालय व कन्या विद्यालय येथे करण्यात आले आहे.

दहावी, बारावी उत्तीर्ण, कोणत्याही ट्रेडमधील आयटीआय, विविध पदविका अभ्यासक्रम तसेच इ.डल., इ.उे. आणि इ.–. पदवीधारक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या ३ ते ४ प्रती, सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व ओळखपत्र सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कर्जत–जामखेडमधील जास्तीत जास्त युवक–युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घेऊन रोजगाराची संधी मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महिला सक्षमीकरण अभियान पारनेर तालुकाध्यक्षपदी सोनाली सालके

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** महसूल विभागांतर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण अभियान'च्या पारनेर तालुका समितीच्या प्रथम अध्यक्षपदी भाजप महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सोनाली संदीप सालके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या निवडीबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी त्यांचा सन्मान करत समितीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्यावर भर देण्याबाबत सुचित केले.

सहअध्यक्षपदी सोनाली श्रीकांत आंबेकर (पारनेर),प्रभाग संघ पदाधिकारी म्हणून सोनी सुनील पवार (निघोज) यांची नियुक्ती झाली आहे. महिला सक्षमीकरण,बचत गट चळवळ तसेच सामाजिक,शैक्षणिक आणि सार्वजनिक क्षेत्रात गेल्या १७ वर्षांपासून केलेल्या कार्याची दखल घेत सालके यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाच्या वतीने हे अभियान राबविण्यात येत असून,महिला बचत गटांना विविध शासकीय योजनांचा लाभ, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. पात्र महिला बचत गटांना शासकीय पडीक जमीन चारा व बांबू लागवडीसाठी नाममात्र भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमातून ग्रामीण महिलांना आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण होण्यास मदत होणार आहे. सालके यांनी यापूर्वी संजय गांधी निराधार योजना समितीच्या सदस्यपदाची जबाबदारीही सांभाळली आहे.या निवडीबद्दल आमदार काशिनाथ दाते व महायुतीच्या पदधिका–यांनी सालके यांचे अभिनंदन केले.

राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण अभियानाच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील महिलांना शासकीय योजनांचा लाभ,रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मिळवून देण्यासाठी तसेच बचत गटांना सक्षम करण्यासाठी या समितीने प्रभावी काम करावे. सोनाली सालके यांनी पारनेर तालुक्यात विविध समीतीच्या माध्यमातून प्रभावी काम करीत महिलांना बचत गट तसेच ईतर शासकीय योजनांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने योगदान दिले आहे.
**राधाकृष्ण विखे–पाटील,पालमंत्री**

# दहिगावने आरोग्य केंद्रासह तालुक्यातील उपकेंद्रांना औषधांचा तुटवडा

### वेळेवर व पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून द्यावा : शेषेराव आपशेटे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये औषधांचा पुरेसा व वेळेवर पुरवठा होत नसल्याने सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते शेषेराव दगडु आपशेटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगाव–ने तसेच शेवगाव तालुक्यातील इतर सर्व उपकेंद्रांमध्ये आवश्यक औषधांसाठी मेडिकल ऑफिसरमार्फत मागणी नोंदविल्यानंतरही औषधांचा पुरवठा होण्यासाठी दोन–दोन, तीन–तीन महिने प्रतीक्षा करावी लागत आहे.

त्यामुळे शासकीय दवाखान्यांमध्ये आवश्यक औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांना खासगी मेडिकलमधून महागडी औषधे खरेदी करावी लागत आहेत. नियमित लागणारी औषधे, प्राथमिक उपचाराचे साहित्य तसेच जीवनरक्षक औषधांचा पुरवठा मागणीच्या तुलनेत कमी प्रमाणात होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वेळेवर औषधे उपलब्ध न झाल्याने गरीब रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**चौकशीसह जबाबदारी निश्चित करण्याची मागणी**

औषधांचा पुरवठा वेळेवर न होण्यामागील कारणांची चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागील काळात शेवगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना किती औषधांचा पुरवठा करण्यात आला, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तातडीने तपासणी करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. औषध पुरवठ्यात हेतुपुरस्सर दिरंगाई करणाऱ्या दोषी घटकांवर प्रशासकीय कारवाई करावी. भविष्यात रुग्णांना औषधांचा तुटवडा भासू नये यासाठी कायमस्वरूपी व गतिमान औषध पुरवठा यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी शेषेराव आपशेटे यांनी केली आहे. आरोग्य केंद्रांना औषधे कमी पडणे आणि पुरवठ्यात दिरंगाई होणे ही बाब थेट जनतेच्या आरोग्याशी संबंधित आहे. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार दि. ०२ ऑक्टोबर २०२६ 

# पाणी नियोजनात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही!
## पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य : डॉ. विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात निर्माण झालेल्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या टंचाई आढावा बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेण्यात आली. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच शेतकऱ्यांच्या मागणीचाही संवेदनशीलपणे विचार करून पाण्याचे नियोजन करा, असे निर्देश विखे पाटील यांनी दिले.

कुकडी प्रकल्पातील पाणीसाठ्यावर मर्यादा येत असून मोटारी सुरू करून मोठ्या प्रमाणात पाणी उपसा सुरू राहिल्यास डिसेंबरमध्येच पाणी संपण्याची शक्यता असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देत उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या आग्रहास्तव आवश्यक त्या ठिकाणी पाणी सोडण्याबाबत मार्ग काढला जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

तहसीलदार सचिन डोंगरे यांनी तालुक्यातील मंडलनिहाय पावसाची सविस्तर आकडेवारी सादर केली. टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू असून उपलब्ध पाणीउद्भव, त्यांची क्षमता आणि भविष्यातील गरज याबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. ग्रामसेवक, सरपंच आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन टँकरचे नियोजन करा, वेळापत्रक तयार करा, अशा सूचना देण्यात आल्या.

पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान होत असून तालुक्यातील १ लाख १६ हजार शेतकरी संकटात असल्याची माहिती कृषी विभागाच्या आढाव्यात समोर आली. यंदा पेरणीचे क्षेत्र घटले असून फळबागांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. संत्रा, पेरू आणि डाळिंबाच्या बागा धोक्यात आल्या आहेत. १८ हजार ८७२ शेतकऱ्यांनी फळपीक विमा काढला असतानाही विम्याच्या नुकसानभरपाईबाबत ठोस माहिती न मिळाल्याने बैठकीत खंत व्यक्त करण्यात आली.

मुरघास निर्मिती तसेच मेंढपाळांसाठी पशुसंवर्धन विभागाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहितीही बैठकीत अपेक्षित पद्धतीने सादर करता आली नाही.

महावितरणच्या आढाव्यात ३ हजार ८९३ सौर प्रकल्पांसाठी भरणा झाला असून ३ हजार ५०० प्रकल्पांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तालुक्यातील ११८ फिडरपैकी २० फिडरना सौर ऊर्जेवर आणण्यात आले आहे. मात्र वीज उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना आवश्यक वेळी वीज मिळत नसल्याची वस्तुस्थिती बैठकीत मांडण्यात आली.

जलजीवन मिशनअंतर्गत सुरुवातीला पाईप खरेदी करण्यात आली; मात्र निधी संपल्याने अनेक कामे अपूर्ण राहिल्याची बाब समोर आली. कामे पूर्ण न झाल्याने अनेक गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याचे स्पष्ट झाले.

अधिकाऱ्यांनी मुख्यालयी थांबून टंचाईच्या परिस्थितीवर लक्ष ठेवावे. शासनाच्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. निष्काळजीपणा कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा बैठकीत देण्यात आला. १९७२ च्या दुष्काळाचा दाखला देत यंदाची परिस्थिती गांभीर्याने हाताळण्याची गरज




व्यक्त करण्यात आली. आयुष्मान भारत तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलपणे काम करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हाधिकारी पंकज आशिया, आमदार विक्रमसिंह पाचपुते,अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आढावा बैठक संपन्न झाल्यानंतर माध्यमांशी चर्चा करताना माध्यम प्रतिनिधी पंचनामे बाबत विचारला असता जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री अहिल्यानगर राधाकृष्ण विखे यांनी सांगितले की सरसकट पंचनामे होणार असून यामध्ये दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

---

## गावठी कट्टा' विक्री करणारा तरुण एलसीबीच्या जाळ्यात !
### कट्टा-काडतूसासह ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील बेलवंडी फाटा परिसरात गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून जेरबंद केले. भागवत गिनेनदेव वनवे (वय २६, रा. वनवेवाडी, ता. आष्टी, जि. बीड, हल्ली रा. देवदैठण, ता. श्रीगोंदा) याच्याकडून गावठी कट्टा, जिवंत काडतूस आणि मोबाईल असा ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.बेलवंडी फाट्याजवळील शुभम गार्डन मंगल कार्यालय परिसरात कट्टा विक्रीसाठी तरुण थांबला असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर पथकाने




पंचांसमक्ष कारवाई करत वनवे याला ताब्यात घेतले. अंगझडतीमध्ये ५० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व एक हजार रुपये किमतीचे जिवंत काडतूस आढळून आले. त्याच्याकडील २० हजार रुपयांचा मोबाईलही जप्त करण्यात आला.**'कट्टा' कुणाकडून आला?**पोलिसांनी केलेल्या चौकशीत वनवे याने हा गावठी कट्टा व काडतूस संग्राम गोविंद पंडीत (रा. गेवराई, जि. बीड) याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. पंडीत हा फरार असून, पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.या प्रकरणी बेलवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३७६/२०२६ अन्वये आर्म्स ॲक्ट कलम ३/२५, ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.**पोलिसांची कारवाई; पुढील तपास सुरू**गावठी कट्टा विक्रीचा प्रयत्न उधळून लावत एलसीबीने एकालाताब्यात घेतले असले तरी कट्टा विक्रीच्या या साखळीमागे आणखी कोण आहेत? शस्त्रांचा पुरवठा कुठून होतो? याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

---

## सोनईतुन तुळजाभवानी पालखीच तुळजापूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत आई तुळजाभवानी मातेच्या पालखीचे तेली समाज व श्री तुळजाभवानी मंदिर विश्वस्थाच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. प्रारभी सोनई येथील श्री संत जगनाडे महाराज मंदिरात व दरदले गल्लीतील तुळजाभवानी मंदिरात धार्मिक विधी औक्षण, दोन्ही समाजाच्या वतीने आरती, भंडारा उधळण, फटाक्याची अतिशबाजी, प्रसाद वाटप करून ठिकठिकाणी भाविकांनी देवी पालखीची पूजन मोठ्या



उत्साहात करण्यात आले. त्यानंतर पालखीचे तुळजापूरकडे प्रस्थान झाले. यावेळी सोनई शहरातून मिरवणूक काढून पालखीचे एकसारखे पिवळी साडी परिधान करून महिलाभाविकांनी पूजन करून साडी चोळीने ओटी भरली. याप्रसंगी भाविकांनी सहभागी होऊन दर्शनाचा लाभ घेतला. याच पालखीतून गाभाऱ्यातील तुळजापूरची देवी बसवून दसऱ्याच्या दिवशी सिमोलघणं केले जाते, व हिंदुस्थानात पहिलंच एकमेव सिमोलघणं असल्याची माहिती भक्त बालू भगत, सागर भगत यांनी दिली. पालखीला मोठ महत्व प्राप्त असल्यामुळे भाविकाची गर्दी असते.देवस्थानाच्या वतीने व तेली समाज बांधवाच्या वतीने भगत परिवाराचा शाल, श्रीफळ देऊनं सन्मानित केले.

---

## कणगर सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील कणगर सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी संस्थेचे चेअरमन अन्सार शेख यांच्या अध्यक्षतेखाली आणि बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या प्रारंभी संस्थेचे सचिव मच्छिंद्र साबळे यांनी संस्थेच्या कामकाजाचा अहवाल सभासदांसमोर सादर केला. संचालक अण्णासाहेब शेटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संस्थेच्या माध्यमातून नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या तसेच जास्तीत जास्त कर्ज भरणाऱ्या सभासदांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच डाळिंब उत्पादनामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचाही गौरव करण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम सुरू असल्याचे यावेळी चेअरमन अन्सार शेख यांनी सांगितले. तर सभापती अरुण तनपुरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले. सभेस संस्थेचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब घाडगे, सरपंच सर्जेराव घाडगे, उपसरपंच बाळासाहेब गाडे, जिल्हा बँकेचे राजेंद्र शेरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य भास्कर गाडे, सुयोग नालकर, नवनाथ मुसमाडे, गोरक्ष नालकर, मच्छिंद्र वरघुडे, संदीप घाडगे, पोपट दिवे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गोविंद दिवे, महंमद इनामदार, जावेद शेख, अण्णासाहेब घाडगे, संजय महाराज शेटे आदी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संचालक भाऊसाहेब खाटेकर, अनिल घाडगे, प्रकाश नालकर, सुभाष नालकर, तुषार गाडे, शंकर जाधव, संदीप घाडगे, अजय मुसमाडे, अण्णासाहेब गाडे , चिमाजी नालकर, बाळासाहेब गाडे यांच्यासह संस्थेचे सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन संचालक अण्णासाहेब शेटे यांनी केले, तर आभार व्हा. चेअरमन भाऊसाहेब घाडगे यांनी मानले.

---

## मुळा नदीवरील बंधारे भरण्यासाठी आज पाणी सोडण्याचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुळा नदीवरील बंधारे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दिल्या आहेत. त्यानुसार आज सकाळी ९ वाजता मुळा नदीपात्रात ५०० दशलक्ष घनफूट (अर्धा टीएमसी) पाणी सोडण्यात येणार आहे.

या पाण्यामुळे मुळा नदीवरील डिग्रस, मानोरी, मांजरी आणि वांजुळपोई यासह परिसरातील बंधारे भरून देण्यात येणार आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या आढावा बैठकीत विखे पाटील यांनी पिण्याच्या पाण्यासोबतच गोधनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी बंधारे भरण्याचे आश्वासन दिले होते.

त्यानुसार पाटबंधारे विभागाकडून आज सकाळी पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. मुळा नदीवरील बंधारे भरल्यानंतर परिसरातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार असून, दुष्काळग्रस्त

शेतकरी तसेच पशुधनाला दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

---

## दुष्काळाचा जनावरांच्या बाजारावर परिणाम, किमतींमध्ये २० ते २५ टक्के घट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** राज्यातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा परिणाम आता जनावरांच्या बाजारावरही स्पष्टपणे दिसू लागला आहे. चारा व पाण्याची टंचाई वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन अनेक शेतकरी जनावरे विक्रीसाठी बाजारात आणत आहेत. मात्र, खरेदीदारांची संख्या घटल्याने जनावरांच्या किमतींमध्ये सरासरी २० ते २५ टक्क्यांपर्यंत घसरण झाल्याचे चित्र आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत लोणी येथे भरणारा जनावरांचा बाजार राज्यातील महत्त्वाच्या बाजारांपैकी एक मानला जातो. या बाजारात




मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र तसेच उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी जनावरे खरेदी-विक्रीसाठी येत असतात. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक भागांतील शेतकरी नवीन जनावरे खरेदी करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

चारा टंचाई आणि जनावरांच्या पालनपोषणाचा वाढता खर्च यामुळे शेतकऱ्यांनी खरेदीपेक्षा विक्रीला प्राधान्य दिले आहे. परिणामी बाजारात जनावरांचा पुरवठा वाढला असला तरी मागणी कमी झाल्याने किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, साधारणपणे आठवड्याला १० ते १२ कोटी रुपयांची उलाढाल होणाऱ्या लोणीच्या जनावरांच्या बाजारातील व्यवहारांवरही दुष्काळाचा परिणाम झाला आहे. यंदा बाजारातील उलाढाल सुमारे २ ते ३ कोटी रुपयांनी घटल्याची माहिती संबंधितांकडून देण्यात आली. दुष्काळाची तीव्रता वाढल्यास आणि चारा टंचाई अधिक गंभीर झाल्यास जनावरांच्या बाजारासह कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या महसूलावरही मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि बाजार समिती प्रशासन यांच्यातही आगामी काळाबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे यांना सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथराव किसनराव आगळे सर यांना अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा संघ व जिल्हा मराठा पतसंस्थेच्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार नुकताच अहिल्यानगर येथे झालेल्या कार्यक्रमात विधान परिषदेचे सभापती ना.रामजी शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर कल्याण रोडवरील जाधव लॉन येथे झालेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रमात विधान परिषदेचे सभापती ना.रामजी शिंदे,पतसंस्थेचे चेअरमन इंजिनियर विजयकुमार ठुबे यांच्या हस्ते व शिव व्याख्याते डॉ.श्रीमंत कोकाटे,जिल्हा उपनिंबधक मंगेश सुरवसे,महापौर ज्योती गाडे,माजी व्हाईस चेअरमन बाळकृष्ण काळे,संचालक किशोर मरकड,राजेश परकाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. जीवन गौरव पुरस्काराबद्दल माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे सरांचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, माजी प्राचार्य शिवाजीराव



देवढे,माजी प्राचार्य लक्ष्मणराव मतकर, प्राचार्य अण्णासाहेब भांड,प्रा.सोपानराव कदम, मराठा पतसंस्थेचे नेवासा शाखाधिकारी संभाजीराव मते पाटील सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग,माजी विद्यार्थी पुणे येथील अजय कुलकर्णी,नेवासा प्रेस क्लबचे मार्गदर्शक पत्रकार अशोक डहाळे,कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण,पत्रकार चंद्रकांत दरंदले,रमेश अवचरे,नितीन पाठक,बाबा कांगुणे यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी व माजी विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

---

## त्रिमूर्तीच्या सुपुत्राची राष्ट्रीय स्तरावर झेप; प्रणित वऱ्हाडेची एआयटीएससीमध्ये देशात चौथ्या क्रमांकावर निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासाफाटा येथील शिक्षण महर्षी स्वर्गीय साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री. दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावीतील विद्यार्थी प्रणित बाळू वऱ्हाडे याने एआयटीएससी मध्ये देशात चौथ्या क्रमांकावर निवड झाली असून त्याने राष्ट्रीय स्तरावर त्रिमूर्ती संकुलाचे नाव उंचावले आहे.




५१ बटालियन छत्रपती संभाजीनगर एनसीसीचा कॅडेट असलेल्या प्रणितची दि. ३ ते १३ सप्टेंबर २०२६ दरम्यान दिल्ली येथे पार पडलेल्या ऑल इंडिया थल सैनिक कॅम्प एआयटीएससी साठी निवड झाली होती. या अत्यंत मानाच्या व कठीण समजल्या जाणाऱ्या कॅम्पमध्ये देशभरातील हजारो कॅडेटसमधून त्याने संपूर्ण देशात चौथ्या क्रमांकावर येण्याचा बहुमान पटकावला आहे.

या अभिमानास्पद यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात प्राचार्य सोपानराव काळे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे,समन्वयक दत्तात्रय वांढेकर, बाबासाहेब तांबे यांच्या हस्ते प्रणितचा शाल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर विद्यालयाचे इतर पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

प्रणितच्या या यशाबद्दल त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा ॲड स्नेहल चव्हाण पाटील,सहसचिव डॉ.श्रुती आमले पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.गौरव आमले पाटील,विश्वस्त चेतन चव्हाण पाटील सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, एनसीसी विभाग व विद्यार्थी व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

# वीज नाही, रस्ते नाहीत, विकास ठप्प
## शिर्डीच्या पूर्वेला विकासाची दिशा देणारा नेता पुढे येणार का?

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** नगरीत महावितरणच्या वारंवार होणाऱ्या वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रकारामुळे आणि अघोषित लोडशेडिंगमुळे सामान्य जनता, व्यावसायिक व नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना शिर्डीतील पूर्वेकडील भागातील भूमिपुत्र नानासाहेब शिंदे व हॉटेल व्यावसायिक किरण गोंदकर यांनी प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले आहे. जागतिक पातळीवरील प्रसिद्ध देवस्थान असलेल्या शिर्डीत देश-विदेशातून साईभक्त येतात; मात्र सध्या येथील उद्योग, व्यवसाय आणि हातावर पोट असणारी सर्वसामान्य जनता यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि छोटे-मोठे दुकानदारांची परिस्थिती बिकट झाली असून व्यवसाय पूर्णतः संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. शिर्डीत साईभक्तांचे येण्याचे प्रमाण का कमी झाले, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असून गर्दी केवळ साई मंदिर परिसर आणि हायवे दर्शन लाईनपुरतीच मर्यादित राहिली आहे. अमर्यादित खुले गेट आणि दर्शन लाईनचा असणारा प्रभाव, तसेच पूर्वेकडील भागाला बसणारा फटका यामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत महावितरणने ग्रामस्थांना व छोट्या व्यावसायिकांना बिलांचा तगादा न लावता योग्य कालावधी देणे आणि परिस्थितीनुसार सहकार्याची भूमिका ठेवणे अपेक्षित आहे. नेहमी मेंटेनन्सचे कारण सांगून वीज बंद ठेवण्याचे सत्र कित्येक दिवस चालणार, असा सवाल किरण गोंदकर यांनी उपस्थित केला आहे. विशेषतः पूर्वेकडील वीरभद्र डीपीचा नेहमीच खोळंबा होत असून रोज दोन-तीन तास वीज बंद राहत आहे. शनिवार व रविवार सारख्या महत्त्वाच्या दिवशी जेमतेम काही रूम भरतात आणि त्यातही तासनतास जनरेटर सुरू ठेवावे लागत आहेत. विजेसह रस्त्यांची दुर्दशा, सुधारित एरियाचा अभाव, रोड लगतच्या झाडांना पाण्याचा अभाव यामुळे पूर्वे कडील भागाची ओळख एक भकास एरिया अशी होत चालली आहे. शिर्डीचा हा पूर्वे चा भाग खरोखरच शिर्डीच्या नकाशात आहे की नाही, असा मोठा प्रश्न निर्माण झाला असून साधा छोटासा प्रकल्पही या दिशेकडे वाटचाल करताना दिसत नाही. पूर्वेकडे अनेक आजी-माजी जनसेवक असतानाही या भागाचा विकास खुंटलेला असून येथील विकास जणू बंद बाटलीत श्वास घेत आहे. त्यामुळे सामान्य जनतेचा छळ रोखण्यासाठी आणि पूर्वेच्या शिर्डीला विकासाची योग्य दिशा देण्यासाठी नेमका कोणता नेता पुढे येतो,



हे आता जनतेने ओळखण्याची वेळ आली असून त्रस्त नागरिकांच्या वतीने प्रशासनाकडे तातडीने योग्य कारवाईची मागणी शिंदे व गोंदकर यांनी केली आहे.